संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने १२ (६+६) किंमत ३ रुपये अहिल्यानगर,सोमवार दि. १९.१०.२०२६ अंक नं. १७० वर्ष ६१ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020










# नवा मराठा




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १९.१०.२०२६ | अंक नं. १७० | वर्ष ६१ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



"25 वर्ष विश्वासाची, पुढील 25 वर्ष विकासाची"

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर २६ व्या वर्षात यशस्वी पदार्पण...

विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा!

सोने, स्थावर व एलआयसी तारण कर्ज सुविधा उपलब्ध.

- मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध
- संस्थेची एम.आय.डी.सी. व दिल्लीगेट येथे स्वमालकीची सुसज्ज इमारत
- ठेवींवर आकर्षक व्याजदर
- सर्व तारण कर्जे असल्यामुळे ठेवींची १००% सुरक्षितता
- ज्येष्ठ नागरिकांना ठेवीवर जास्त व्याजदर व घरपोहोच सेवा

प्रथितयश उद्योजक संचलित

**धनसंपदा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.**

: मुख्य कार्यालय :
प्लॉट नं. पी-२३, चाकण ऑईल मीलसमोर, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर. फोन नं. २७७७०४९.

: शाखा :
दिल्लीगेट, अहिल्यानगर. फोन नं. २३२७३१९.

Email : dhansampda@gmail.com
Website : https//dhansampadapatsanstha.com

Career Ki Shuruwat DiSHA ke saath

Get Any Course Just in 2700/-

MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.

An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE

दिल्ली गेट शाखा
9371051769

जुने बस स्टँड शाखा
9371151769

पाईपलाईन शाखा
7447761769

शिंगवी ज्वेलर्स प्रा.लि.

68 Golden Years

खरेदी दागिन्यांची, भेटवस्तू तुमच्या पसंतीची*

खरेदी करा व तुम्हाला हवी ती भेटवस्तू घरी घेऊन जा!

ROOP LAB GROWN DIAMOND COLLECTION

digital Gold — Download the App Now

नियम व अटी लागू*

सिटी शोरूम : जुना कापड बाजार, अ.नगर 8087343030
सावेडी शोरूम : प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर 8605500025





कॅमल सुपरफाईन शाबुदाणा

उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..

1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध

कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध

सर्व किराणा दुकानात उपलब्ध

स्टॉकिस्ट
**अशोक बन्सीलाल पारख**
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES — Since 1966
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

विजयादशमी
बासुंदी, रसमलाई व सिताफळ रबडी

- बंगाली मिठाई
- ड्रायफ्रुटस् मिठाई
- शुगर फ्री मिठाई
- गरमागरम नाष्टा
- इंदौरी नमकिन

Since 1910
**बम्बईवाला**
मिठाईयाँ एवम् फरसाण
स्वीटस् । नमकीन । ड्रायफ्रुट
कापड बाजार, अ.नगर. | चाणक्य चौक, बुरूडगाव रोड, अ.नगर.
मो. : 9822041013 / 9623882710

बुकिंग सुरु

Serenity

या दसऱ्याला करा स्वप्नातील घराचे स्वप्न साकार!

या दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर बुक करा आपल्या हक्काचं नवं घर

अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज

- टेरेस गार्डन
- आधुनिक बांधकाम
- सुसज्ज पार्किंग सुविधा
- अत्याधुनिक डिजिटल सुरक्षा प्रणाली

प्राईम लोकेशन प्रीमियम फ्लॅट्स

3BHK LUXURIOUS APARTMENT





PROJECT BY - VASUDHA GROUP

कवीजंग नगर, युनियन बँकेजवळ, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर
9730969093 | 9860182219

या दसऱ्याला संकल्प नव्या घराचा, आनंद सुखी संसाराचा!

Pristine

बुकिंग सुरु

या दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर बुक करा आपल्या हक्काचं नवं घर

अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज

- टेरेस गार्डन
- आधुनिक बांधकाम
- सुसज्ज पार्किंग सुविधा
- अत्याधुनिक डिजिटल सुरक्षा प्रणाली

3BHK LUXURIOUS APARTMENT

रेडी पझेशन

प्राईम लोकेशन प्रीमियम फ्लॅट्स





PROJECT BY - VASUDHA GROUP

डुंगरवाल हॉस्पिटल शेजारी, सावेडी नाका, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
9881883993 | 9860182219 | 9730969093

यंदाची सुवर्णखरेदी — दिवाळी धमाका ऑफर — भरघोस फायद्याची..

₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/- चांदी चक्र फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)

सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे
11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध

खास नवरात्रोत्सवानिमित्त
वेढणी व क्वाईनच्या रूपानं शुध्द सोनं खरेदी करा.

0.5gm / 1gm / 2gm / 5gm / 10gm / 15gm 20gm / 25gm / 50gm

99.50 शुध्दतेमधील प्रत्येक वजनामध्ये वेढणी, क्वाईन व आपट्याचे पान उपलब्ध.

**चंदुकाका ज्वेल्स**
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

2014 पासुन आपल्या सेवेत..सोनेरी नातं..

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगर शहर हद्दीबाहेरील गावांनाही ‘सीना नदीच्या पूरनियंत्रण रेषे’चा फटका

## जमिनींच्या विकासावर मर्यादा, पुनर्विचार करण्याची नवनागापूर–वडगाव गुप्ता ग्रामस्थांची मागणी

नगर – नगर शहर हद्दीबाहेरील गावांनाही सीना नदीच्या पूरनियंत्रण रेषेचा फटका बसणार असून तेथील ग्रामस्थांच्या जमिनींच्या विकासावर मर्यादा येणार आहेत. त्यामुळे सीना नदीच्या पूरनियंत्रण रेषेचा पुनर्विचार, पुनर्वेक्षण करून ती तांत्रिक अभ्यासाच्या आधारे सुधारित करण्यात यावी, अशी मागणी नवनागापूर–वडगाव गुप्ता परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी व जमीनमालकांकडून करण्यात येत आहे. सध्याच्या पूरनियंत्रण रेषेमुळे अनेक जमिनींच्या वापरावर आणि भविष्यातील विकासावर मर्यादा येत असल्याने संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

नवनागापूर व वडगाव गुप्ता परिसरातून सीना नदी वाहत असून, या भागातील अनेक जमिनी नदीच्या दोन्ही बाजूंना आहेत. यापूर्वी या परिसरातील जमिनी एमआयडीसीच्या विकासासाठी संपादित करण्यात आल्या आहेत. अहिल्यानगर शहराच्या औद्योगिक व नागरी विकासात स्थानिक ग्रामस्थांचे मोठे योगदान राहिले आहे. मात्र, उर्वरित जमिनींच्या विकासाबाबत आता पूरनियंत्रण रेषेचा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, काही जमिनींवर प्रत्यक्षात पूराचे पाणी पोहोचल्याची माहिती किंवा नोंद नसतानाही त्या क्षेत्रात पूरनियंत्रण रेषा निश्चित करण्यात आल्याची तक्रार आहे. त्यामुळे संबंधित जमीनमालकांना आपल्या जमिनींचा नियोजनबद्ध वापर व विकास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील जमिनींचा रहिवासी वापरासाठी विकास करण्याच्या शक्यतांवरही याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर सीना नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला कोणताही अडथळा निर्माण न करता नदीपात्राची स्थिती, पूरप्रवाहाची दिशा, उपलब्ध पूरनोंदी आणि प्रत्यक्ष भौगोलिक परिस्थिती यांचा सखोल तांत्रिक अभ्यास करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

संबंधित विभागाने प्रत्यक्ष स्थळपाहणी करून पूरनियंत्रण रेषेचे पुनर्सर्वेक्षण करावे. ज्या ठिकाणी तांत्रिकदृष्ट्या आवश्यक आणि नियमानुसार शक्य असेल, तेथे पूरनियंत्रण रेषेत सुधारणा करावी. तसेच स्थानिक ग्रामस्थ व जमीनमालकांचे म्हणणे ऐकून त्यांच्या जमिनींच्या वापरावर होणाऱ्या परिणामांचा विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### पूरनियंत्रण आणि विकास यांचा समतोल साधण्याची गरज

सीना नदीच्या पूरधोक्यापासून नागरिकांचे संरक्षण होणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच प्रत्यक्ष परिस्थितीच्या आधारे योग्य नियोजन होणेही आवश्यक आहे. त्यामुळे पूरनियंत्रणाच्या नियमांचे पालन कायम ठेवून ग्रामस्थांच्या जमिनींच्या विकासाबाबत न्याय्य निर्णय घ्यावा, अशी मागणी नवनागापूर–वडगाव गुप्ता परिसरातील नवनागापुरचे माजी सरपंच दत्तापाटील सप्रे, ज्ञानदेव सप्रे, अशोक भोर, गोरक्षनाथ गव्हाणे, अरुण भोर, बजरंग भोर, किशोर भोर, ॲड.धनराज सप्रे यांच्यासह ग्रामस्थांनी, शेतकरी व जमीनमालकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून निर्णय घ्या : ॲड. धनराज सप्रे पाटील

सीना नदीच्या पूरनियंत्रणाचा उद्देश कायम ठेवून पूरप्रभावित क्षेत्राची वस्तुनिष्ठ तपासणी करावी. सक्षम तांत्रिक यंत्रणेमार्फत पुनर्सर्वेक्षण करून पूरनियंत्रण रेषेतील संभाव्य त्रुटींचा अभ्यास करावा. तसेच नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला बाधा न आणता नियमांनुसार आवश्यक सुधारणा कराव्यात, स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी व जमीनमालकांचे म्हणणे ऐकून प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी व जमिनींच्या वापरावर होणारे परिणाम विचारात घेऊन निर्णय घ्यावा, असे ॲड. धनराज सप्रे पाटील यांनी म्हंटले आहे.

# भाऊसाहेब पांडुळे यांची गळफास घेत आत्महत्या



नगर – रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय कार्यालय अहिल्यानगर येथे कार्यालय अधिक्षक म्हणून कार्यरत असलेले राजवर्धन उर्फ भाऊसाहेब दत्तात्रय पांडुळे (वय ५०, रा. सारसनगर, अहिल्यानगर) यांनी केडगाव बायपास चौक येथील एका हॉटेलच्या रूममध्ये गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना १९ ऑक्टोबर रोजी दुपारी उघडकीस आली आहे.

पांडुळे यांनी १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी त्या हॉटेलमध्ये रूम घेतली होती. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी हॉटेलमधील कर्मचाऱ्यांनी अनेकदा रुममध्ये इंटरकॉमवर तसेच त्यांच्या मोबाईल वर फोन करूनही पांडुळे यांनी प्रतिसाद न दिल्याने कर्मचाऱ्यांनी दरवाजा उघडून पाहिला असता त्यांना पांडुळे हे गळफास घेतल्याच्या अवस्थेत आढळून आले. त्यामुळे हॉटेल व्यवस्थापकाने तात्काळ कोतवालीचे स.पो.नि. कुणाल सपकाळे यांना फोन करून माहिती दिली.

सपकाळे यांनी तातडीने पोलीस पथकासह घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर रुग्णवाहिका बोलावून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. त्यांनी आत्महत्या का केली, हे दुपारी उशिरापर्यंत समजू शकले नाही. आत्महत्येच्या कारणांचा शोध पोलीस घेत आहेत. या बाबतची माहिती समजल्यावर अनेकांना धक्का बसला.

मयत भाऊसाहेब पांडुळे यांच्या पश्चात पत्नी, १ विवाहित मुलगा, १ विवाहित मुलगी असा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांचे ते बंधू होत.

## उज्ज्वलाबाई लोखंडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सिद्धार्थनगर म्युनिसिपल कॉलनी येथील रहिवासी उज्ज्वलाबाई संजय लोखंडे (वय ४२) यांचे १७ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, ३ मुली, जावई, नातवडे असा परिवार आहे. प्रतीक लोखंडे, तनुजा, सारिका, मयुरी यांच्या त्या मातोश्री होत.

## नागापूर परिसरातून मोटरसायकलची चोरी

नगर – शहरातील नागापूर येथील जिमखान्याजवळ असलेल्या एका मोबाईल शॉपी समोर लावलेली हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटरसायकल (क्र.एमएच १६ बीपी ९८३१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ ते रात्री ८.३० दरम्यान घडली आहे.

याबाबत संदेश संजय कसबे (वय ३०, रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. नागपूर चौक परिसरातून त्यांची मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (४) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# समान वेतनासाठी न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा काळ्या फिती लावून निषेध

## ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा; १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा



नगर – समान काम, समान वेतन या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. या मागणीच्या समर्थनार्थ कौटुंबिक न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी दोन दिवस काळ्या फिती लावून शांततेच्या मार्गाने काम काज करत शासनाचे लक्ष वेधले. शासनाने वेतनश्रेणी सुधारणेची मागणी मान्य न केल्यास ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा घेण्यात येणार असून, त्यानंतरही निर्णय न झाल्यास १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा न्यायालयीन कर्मचारी संघटनेने दिला आहे.

दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही मुंबई उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यां प्रमाणे समान काम, समान वेतनाच्या धर्तीवर सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या माध्यमातून वेतनश्रेणी सुधारणा समितीने मंजूर केलेला प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र, सुमारे २० महिने उलटूनही या प्रस्तावावर शासनाकडून ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. त्यामुळे न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

दुय्यम न्यायालयांतील कर्मचारी हे न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा आहेत. प्रतिकूल परिस्थितीतही ते प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने आपले कर्तव्य बजावतात. असे असतानाही त्यांच्या वेतनश्रेणीत तफावत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. समान कामासाठी समान वेतन आणि सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीसाठी संघटनेने आंदोलनाची पुढील दिशा निश्चित केली आहे.

शासनाने ५ नोव्हेंबरपर्यंत मागणी मान्य न केल्यास राज्यातील न्यायालयीन कर्मचारी सामूहिक रजेवर जाणार आहेत. त्यानंतरही मागणी मान्य झाली नाही, तर १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. या आंदोलनामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर न्यायालय येथील कार्यरत कर्मचारी असिफ शेख, अर्चना झिंजे, रोहित गुंडू, धीरज नारखेडे, महेंद्र बोगा, एजाज शेख, विकास वाघमारे आणि लहानुबाई जाधव यांनीही समान वेतनाच्या मागणीला पाठिंबा दर्शविला आहे.

## नंदाबाई बुगदे यांचे दु:खद निधन



श्रीरामपूर – शहरातील नंदा नंदकुमार बुगदे (वय ७०) यांचे दु:खद निधन झाले. त्यांचे पश्चात दोन मुले, मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. पुणतांबा ग्रामीण रूग्णालयाचे औषध निर्माण अधिकारी निशिकांत बुगदे व छत्रपती संभाजीनगर येथील गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकचे वरिष्ठ लिपीक नितीन बुगदे यांच्या त्या मातोश्री होत.

## मनोज सुपेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नांगरे गल्ली येथील रहिवासी मनोज शंकरराव सुपेकर (वय ५५) यांचे ११ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, भाऊ, पुतण्या, भावजय असा परिवार आहे. भोला टि सेंटरचे ते संचालक होत.

## काशिनाथ धोकटे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भिंगार येथील नामदेव शिंपी समाजाचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टचे माजी अध्यक्ष, सिटी सर्वेचे सेवानिवृत्त कर्मचारी काशिनाथ (आबा) शंकरराव धोकटे (वय ९१) यांचे १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्लेश्वर मंदिर जवळ भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातसुना नातू, नाती, परतवंडी असा परिवार आहे.

## चतुराबाई थोरवे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सावेडीतील सोनानगर चौक येथील रहिवासी चतुराबाई थोरवे (वय ७०) यांचे १५ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती, तीन मुली व एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. मूळ आष्टी तालुक्यातील पुंडी या गावच्या त्या रहिवासी होत्या. मात्र, अनेक वर्षांपासून सावेडीतील सोनानगर चौकातील निवासस्थानी होत्या. कर्जत तालुका दूध संघाचे संकलन विभागप्रमुख राजाराम थोरवे यांच्या त्या पत्नी, तर पालघर कोषागार कार्यालयातील कनिष्ठ लेखापाल संदीप थोरवे, पाऊलबुद्धे महाविद्यालयाच्या प्रा. भारती औटी, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. ज्योती खराडे व करमाळ्याच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रीती शेटे यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगर शहरात मोकाट अन् पिसाळलेल्या कुत्र्यांचा सुळसुळाट

## २५ हजार मोकाट कुत्री असल्याचा मनपाकडून अंदाज, पकडण्यासाठी विशेष मोहीम



अहिल्यानगर शहरातील मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांना पकडण्याची मोहीम महानगरपालिकेकडून सुरू करण्यात आली आहे. पिसाळलेल्या कुत्र्यांना कर्मचारी पकडत असतानाचे हे तपकीर गल्ली येथील चित्र.

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेतर्फे शहरातील मोकाट आणि पिसाळलेल्या कुत्र्यांच्या वाढत्या त्रासाची दखल घेत त्यांच्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरात सध्या अंदाजे २५ हजार मोकाट कुत्री असल्याचा अंदाज मनपाकडून वर्तवण्यात आला आहे. तर, या मोकाट कुत्र्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मनपाकडून पिंपळगाव माळवी येथे पाचशे कुत्र्यांच्या क्षमतेचे श्वान निवारा केंद्र (सेंट्रल डॉग शेल्टर) होम उभारण्यात आलेले असून, पाचशे कुत्र्यांचा कायमस्वरूपी सांभाळ करण्यात येणार आहे. त्यासाठी महिन्याला ८ लाख ७६ हजार रूपये, तर वर्षाला एक कोटीपेक्षा जास्त खर्च होणार आहे. परंतु २५ हजार मोकाट कुत्र्यांसाठी पाचशे कुत्र्यांच्या क्षमतेचे श्वान निवारा केंद्र कितपत प्रभावी ठरेल याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

नगर शहरात दिवसेंदिवस मोकाट कुत्र्यांची संख्या वाढतच आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरातील विविध भागांत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून, लहान मुले, वृध्द तसेच वाहनधारकांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. कुत्रे पकडण्यासाठी असलेली महापालिकेची यंत्रणा अपुरी पडत असल्याने नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होत आहेत.

महापालिका प्रशासनाने पिंपळगाव माळवी येथील जुन्या इमारतीमध्ये सेंट्रल डॉग शेल्टर होम तयार केले आहे. पकडण्यात आलेल्या कुत्र्यांना ठेवण्यासाठी सुरक्षित शेड उभारण्यात आले असून, त्याठिकाणी अन्न, पाणी, स्वच्छता आणि वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करण्यात आली आहे. या केंद्राच्या व्यवस्थापनासाठी महापालिकेने निविदा प्रक्रिया राबवून एका संस्थेची नियुक्ती केली आहे. संस्थेकडून कुत्र्यांच्या निगा राखण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले आहे. शहरात टप्प्याटप्प्याने मोकाट कुत्रे पकडण्याची मोहीम राबवून त्यांना या निवारा केंद्रात हलविण्यात येणार आहे. विशेषतः शाळा, रूग्णालये आणि नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या परिसरातील कुत्र्यांना पकडून निवारा केंद्रात ठेवले जाणार आहे. या व्यवस्थेसाठी संबंधित संस्थेला मनपा निधीतून मोबादला दिला जाणार आहे.

### रहिवासी भागातील कुत्र्यांचे निर्बीजीकरण

शहरातील रहिवासी भागांमध्ये आढळणाऱ्या मोकाट कुत्र्यांसाठी यापूर्वीप्रमाणे निर्बीजीकरण आणि रेबीज लसीकरणाची प्रक्रिया सुरू राहणार आहे. पिंपळगाव माळवी येथे या कामाची जबाबदारी एका संस्थेकडे देण्यात आली आहे. सध्या दररोज सुमारे १० ते १२ कुत्र्यांवर शस्त्रक्रिया केली जात असून, महिन्याला साधारण ३५० ते ४०० कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले जाते. मात्र, शहरातील कुत्र्यांची संख्या वाढतच असल्याने या मोहिमेच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## तपोवन रोडवर तरुणाची गळफास घेत आत्महत्या

नगर – सावेडी उपनगरातील तपोवन रोड परिसरातील सारनाथ रो–हाउसिंग सोसायटी, थ्रीडी कॉर्नर येथे राहणाऱ्या एका ३८ वर्षीय तरुणाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची १८ ऑक्टोबर रोजी पहाटे २.२० वाजताच्या सुमारास उघडकीस आली आहे. सुहास उल्हास जगधने (वय ३८ वर्ष) असे मृत पावलेल्या तरुणाचे नाव आहे.

सुहास जगधने याने राहत्या घरी गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर त्याचे नातेवाईक उल्हास रंगनाथ जगधने यांनी त्याला उपचारासाठी तातडीने अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. कुटाळे यांनी त्याची तपासणी करून उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित केले. या घटनेबाबत तोफखाना पोलिसांना माहिती देण्यात आली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## विहिरीतील पाण्यात बुडून एकाचा मृत्यू

नगर – राहत्या घराजवळ विहिरीतील पाणी काढत असताना पाय घसरून पाण्यात पडल्यामुळे ५६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नगर तालुक्यातील भोरवाडी येथे १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी घडली आहे. बाळासाहेब रंगनाथ टांगळ (वय ५६, रा. भोरवाडी, ता. नगर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाळासाहेब टांगळ हे त्यांच्या राहत्या घरा जवळील विहिरीतून पाणी काढत असताना अचानक पाय घसरल्याने विहिरीत पडले. या घटनेनंतर परिसरातील नागरिक व नातेवाईकांनी त्यांना विहिरीतून बाहेर काढले. त्यांचे नातेवाईक भिवसेन भगाजी टांगळ यांनी त्यांना उपचारासाठी तातडीने अहिल्यानगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. परंतु, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेबाबत सिव्हिल हॉस्पिटलचे मेडिकल ऑफिसर डॉ. काळे यांच्या अहवालानुसार नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# शेतकऱ्याने झेंडूच्या शेतात केली होती गांजाची बेकायदेशीर लागवड, पोलिसांनी छापा टाकत २२ लाखांचा मुद्देमाल केला जप्त, १ जण जेरबंद



नगर – नगर तालुक्यातील इमामपूर शिवारात झेंडूच्या पिकात लपवून गांजाची बेकायदेशीर लागवड केल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखा आणि एमआयडीसी पोलिसांनी उघडकीस आणला आहे. संयुक्तपणे केलेल्या या धडक कारवाईत पोलिसांनी तब्बल २२ लाख २० हजार ७५० रुपये किमतीचे ४४ किलोहून अधिक वजनाचे गांजाचे झाडे जप्त केली असून, याप्रकरणी एकाला अटक केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर व अंमली पदार्थ तस्करीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिलेले आहेत. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे आणि पोलीस अंमलदार विष्णू भागवत, दीपक घाटकर, विकास साळवे, भीमराज खर्से, रोहित येमुल, वंदना मोढवे यांचे एक पथक तयार करून अवैध व्यावसायिकांची माहिती काढून कारवाई करण्याच्या सूचना देऊन रवाना केले होते.

सदर तपास पथक एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीत गस्त घालत असताना, इमामपूर (ता. नगर) येथील देविदास टिमकरे याने त्याच्या शेतातील झेंडूच्या पिकांमध्ये गांज्याच्या झाडांची लागवड केल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीची खात्री करून पथकाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि. हेमंत थोरात यांना लेखी अहवालाद्वारे माहिती कळवली. त्यानंतर नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने यांच्या आदेशानुसार स.पो.नि. थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जरे आणि एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अंमलदार राजु सुद्रीक, गोरक्षनाथ केदार, ज्ञानेश्वर तांदळे, प्रल्हाद पालवे, सुरज देशमुख, राजेश राठोड तसेच पंच व आवश्यक साहित्यासह इमामपूर शिवारातील संबंधित शेतात पोहोचले.

पंचासमक्ष व आरोपी देविदास टिमकरे याच्या उपस्थितीत शेताची पाहणी केली असता, झेंडूच्या पिकाच्या आडोशाला गांजाची लहान–मोठी झाडे जोमाने वाढलेली आढळून आली. पोलिसांनी याप्रकरणी मुख्य आरोपी देविदास रंगनाथ टिमकरे (वय ६४, रा. इमामपूर, ता. नगर) यास ताब्यात घेतले. त्याच्या शेतातून २२ लाख २० हजार ७५० रुपये किमतीची ४४.४१५ किलोग्राम वजनाची गांजाची लहान–मोठी झाडे जप्त करण्यात आली.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(ब)(क), २०(अ)(ब), २०(१)(२)(क) सह २२(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलीस करत आहेत.





जागतिक वास्तुविशारद दिनानिमित्त एसा संस्थेच्या वतीने सभासद आणि विद्यार्थ्यांसाठी प्रख्यात आर्किटेक्ट मनीष बँकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील आर्किटेक्ट, इंजिनिअरिंग महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. (छायाचित्र – लहु दळवी )

# दर्जेदार वास्तुनिर्मितीसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि कल्पकतेचा समन्वय आवश्यक

### जागतिक वास्तुविशारद दिनानिमित्त एसा संस्थेतर्फे आर्किटेक्ट मनीष बँकर यांचे व्याख्यान

नगर – जागतिक वास्तुविशारद दिनानिमित्त एसा संस्थेच्या वतीने सभासद आणि विद्यार्थ्यांसाठी प्रख्यात आर्किटेक्ट मनीष बँकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात त्यांनी साकारलेल्या विविध वास्तुप्रकल्पांचे सादरीकरण करत वास्तुरचनेतील कल्पकता, आधुनिक तंत्रज्ञान आणि नियोजनाचे महत्त्व उलगडून सांगितले. त्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. शहरातील आर्किटेक्ट, इंजिनिअरिंग महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

बँकर यांनी आपल्या व्याख्यानात पुण्यातील न्याती युनिट्री कॉर्पोरेट ऑफिस, कुदळे येथील ध्यान विहार, त्यांचे टाऊ स्टुडिओ ऑफिस, स्वस्तिक लक्झरी वेलबीइंग सेंटर, पुण्यातील मेनोरा सेंटर येथील वृंदावन सेंटर, आयु विहार कुदळे (पुणे), जोधपूर (राजस्थान) येथील शुभयान रिट्रीट तसेच अहिल्यानगरमधील गिरीश भाटिया यांचे कोर्ट हाऊस अशा विविध वास्तुप्रकल्पांची माहिती दिली. प्रत्येक वास्तूची संकल्पना, रचना आणि वैशिष्ट्ये यांचे त्यांनी सविस्तर सादरीकरण केले. त्यांच्या कामातील वेगळेपणा आणि सादरीकरणाची शैली यामुळे उपस्थितांनी विशेष उत्सुकता दाखवली.

कार्यक्रमापूर्वी बँकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करावा, वास्तुरचना क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यापूर्वी चांगल्या फर्ममध्ये काम करून प्रत्यक्ष अनुभव मिळवावा, असा सल्ला त्यांनी दिला. व्यावसायिक क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, अनुभव आणि तांत्रिक ज्ञान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

एसा संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी संस्थेने प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात आर्किटेक्ट डे साजरा केल्याचे सांगितले. कार्यक्रमाला महानगरपालिकेचे एडीटीपी गणेश चिल्लाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. इंटेरियर डिझायनर असोसिएशन, आर्किटेक्ट असोसिएशन, क्रेडाई, बिल्डर असोसिएशन आणि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स या विविध संस्थांचे पदाधिकारी तसेच महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील आणि नगररचना व मूल्यनिर्धारण विभागातील अधिकारी उपस्थित होते. रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, विखे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, छत्रपती शिवाजी महाराज इंजिनिअरिंग कॉलेज, गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, आडसुळ पॉलिटेक्निक कॅम्पस आणि पाऊलबुधे पॉलिटेक्निक येथील विद्यार्थी व प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष सुनील औटी, संतोष खांडेकर, अन्वर शेख, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, गौरव मांडगे, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, अमेय कुलकर्णी, विजय उजनीमठ यांच्यासह संस्थेचे सभासद उपस्थित होते. बँकर यांचा परिचय संस्थेचे सहसचिव अनमोल जैन यांनी करून दिला. सूत्रसंचालन आर्किटेक्ट कविता जैन यांनी केले, तर संस्थेचे सचिव भूषण पांडव यांनी आभार मानले.

### प्रायोजकांचा उपक्रमाला प्रतिसाद

कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक एस.आर.जे. स्टीलचे अविनाश पुरोहित, विशाल येसेकर, टोस्टेम विंडोचे शुभम बनसोडे, शनीराज टाइल्सचे शिवाजी शिंदे आणि व्यंकटेश इन्फ्राचे ओम आठरे उपस्थित होते. याशिवाय अंबिका स्टोन क्रशर, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, श्री आनंद सेल्स, पटेल सिरॅमिक, वैष्णवी टाईल्स, डायकीन एसी, श्रीराम मार्बल, अर्टिको लिफ्ट, पंकज स्टील, ढोणे ट्रेडर्स, अभय सेल्स कॉर्पोरेशन, शुभारंभ टाइल्स, संकल्प इंटरप्रायजेस आणि डायमंड टाईल्स यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

### स्वसामर्थ्याला जागवावे

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




कालचक्र केव्हा व कसे फिरेल हे कोण सांगेल? कुणाच्या नशिबी काय भोग येतील, हे होरपळल्यानंतरच कळेल. शासन भ्रष्ट असेल, समाजाची नैतिकता ढासळली असेल आणि अगतिक जीव अनंत विवंचनांनी घेरलेला असेल, तर ते चित्र कसे दिसेल?

कसे दिवस आलेत ? दुष्टांशीच करावा लागतो व्यवहार. त्यांचे ऐकावे लागतात उन्मत्त प्रलाप. करावी लागते उलट आपल्यालाच त्यांची मनधरणी अपार. तरीही पदरी पडते हार. भोगावे लागतात अपमानाचे प्रहार. लाचारीच्या अंतर्यातनांनी जीव होतो बेजार. खायच्या दुष्टाच्या लाथा, वर पुन्हा त्याच्याच चरणी टेकवायचा माथा. मन रडते आतल्या आत. पण हास्य आणावेच लागते ओठांत. मन भकास, वृत्ती सदैव उदास. कसा मी अगतिकपणे झालो या दुर्जनाचा दास? पोटासाठी हे कुठले श्वानवत आचरण करणे नशिबी येते? केवळ श्वासोच्छासा करण्यापुरते जगण्यासाठी मन मारावे लागते. ज्याला ना बुद्धी. ना अक्कल, त्याला करावा लागतो जुलमाचा रामराम. जगणे होते हराम. पोटासाठी मिळवायचे चार दाम, म्हणून करायचे हे असले क्षुद्र लाचार काम. असे का पण? का करायचे सहन? आशा, व्यर्थ आशा दाखविते हा तमाशा. समर्थ रामदासांना कालचक्राची ही गती जाणवली. शासनकर्त्यांची निलाजरी दुष्ट व लुटारू भ्रष्ट, प्रवृत्ती जनतेची जी दशा करून गेली, ती समर्थांनी व्यक्त केली.

केवळ पोट जाळायला, लोक लागले जनावरांचे जिणे जगायला, तरीही मिळेना काही खायला. नुसते काबाडकष्ट करायचे आणि रक्त ओकून मरायचे. निलाजऱ्या गुंड प्रवृत्ती सर्वत्र बोकाळल्या. सज्जनांच्या सर्व आशा मावळल्या. उदंड उन्मत झाले जग. प्रामाणिकांची केवळ तगमग.

हे विश्वनियंत्या, असे भलतच घडू देऊ नकोस तुझ्या जगात. अपयश का घेतोस पदरात? तू सर्वशक्तिमान आहेस. अशक्य हे तुला शक्य आहे. घडवून आण तू ते आणि सोडव तू या गुलाम बनलेल्या सामान्यजनांना.

पण बा माणसा, हा सर्व शक्तिमान तू, म्हणजे कोण ? बा माणसा, तूच तूच हो संघटित. तूच घडव अघटित. जागव संघटित जनशक्ती. वापर दुष्टांना दंड करणारी युक्ती. सज्जनांना या नरकयातनातून दे तू मुक्ती. या विश्वात तूच आहेस ती चैतन्यमूर्ती. तुझ्याच रूपाने अवतरले आहे ब्रह्म या लोकी. ओळख स्वतःला. जागव स्वसामर्थ्याला. बदलून टाक या परिस्थितीला.

पुराणातली कथा आहे. मुंग्यांच्या वारुळात साप शिरायचा. मुंग्यांना देशोधडीला लावायचा. मुंग्या गेल्या देवाकडे म्हणाल्या, दुष्टांना तू साह्य का करतोस? देव जागा झाला. म्हणाला, मी नाही करीत साह्य. तुम्हीच स्वत:ला सावरा. वारुळ बांधताना आत चोरकप्पे करा. त्यात तुमची वस्ती करा. साप आत शिरताच सगळ्या त्यावर तुटून पडा. चावे घेऊन त्याला जर्जर करा. मुंग्यांनी तसे केले. साप हैराण झाले. तेव्हापासून मुंग्यांनी जे वारुळ वापरून साडले. तेथेच साप राहतात.

– **किशोर गांधी**

# मखदुम सोसायटीतर्फे अहिल्यानगरमध्ये २१ ऑक्टोबरला दुर्मीळ नाणी नोटांचा प्रदर्शन




नगर – शहीद अश्फाकुल्लाह खान व स्वतंत्रता सेनानी बहादूर शाह जफर यांच्या जयंतीनिमित्त मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी तर्फे शिवशाही, निजामशाही, ब्रिटिश राजवटीच्या वेगवेगळ्या काळात चालणारे चलनाचे अहमदनगरचे नाणी संग्राहक सचिन डागा यांनी संग्रहित केलेल्या नाणी नोटांच्या प्रदर्शनाचे आयोजन २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत गोविंदपुरा येथील पी.ए.इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली असल्याचे सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी सांगितले.

नकाशे सदर प्रदर्शनात जुने कॉइंस निजामशाही शिव शाही ब्रिटिशकालीन जुन्या नोटा, फॅन्सी नंबर्स नोटा, नोटांची बंडली, दुर्मिल वस्तु अशा अनेक महत्त्वाच्या संग्रहीत दुर्मिळ चलणे प्रदर्शनात पहायला मिळतील. कार्यक्रम विनामूल्य आहेत. याचा लाभ घ्यावा असे आवाहन सचिव डॉ. कमर सुरूर यांनी केले आहे.

# पंजाबी व शीख समाजातर्फे विविध शहरांत वधू–वर परिचय संमेलन

पुणे – पंजाबी व शीख समाजाच्या वतीने पुणे, रायपूर, भोपाळ, अहमदाबाद, सुरत व कोटा या शहरांमध्ये वधू–वर परिचय संमेलनांचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे येथे द पंजाबी कल्चर असोसिएशन, सॅलिसबरी पार्क, गुलटेकडी, पुणे येथे १ नोव्हेंबर रोजी संमेलन होणार आहे. तसेच रायपूर येथे २१ नोव्हेंबर, भोपाळ येथे २० डिसेंबर, अहमदाबाद येथे २७ डिसेंबर, सुरत येथे १० जानेवारी २०२७ आणि कोटा येथे ७ फेब्रुवारी २०२७ रोजी संमेलन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. ही माहिती कश्मीरी नागपाल, अरुण चोपडा, पद्मेश दर्गण, संगीता मल्होत्रा, हरीश मदान आणि किशोर कंत्रोड यांनी दिली आहे.

अरुण चोपडा मो. नं. ९६२३११६१७०, संगीता मल्होत्रा मो. नं. ९९२२४२९७१४, पद्मेश दर्गण मो. नं. ८२२८९९१९९१, किशोर कंत्रोड (अहिल्यानगर) मो. नं. ८९९९८१२४०८/९२२६७८३१०१ यांच्याशी संपर्क साधावा. या संमेलनाच्या हेतु असा आहे की, आजच्या नवयुगात प्रत्येकाला आपल्या योग्य जीवनसाथीची निवड करता यावी योग्य माहिती मिळावी. ज्यांना सदर परिचय संमेलनात भाग घ्यायचा त्यांनी आपल्या सोबत वर व वधु आणणे जरुरी आहे. त्या शिवाय त्यांना आत प्रवेश दिला जाणार नाही.

अधिक माहितीसाठी संपर्क : पुणे – पंजाबी वेल्फेअर फाउंडेशन हरीश मदान – ९३२५६५९१४२, सुरेंद्र वाधवा – ८६००८६६०००, लीना सप्रा – ९८६०६०७१२७, जबलपूर – पंजाबी हिंदू असोसिएशन उमेश खुराना – ८०८५९५९८४९, आर. के. कपूर – ९१३१५५०७००, नागपूर – सनातन भवन नरेंद्रनाथ साहनी – ९८२२२०४०५७, नरेंद्र सेठिया – ९८९०३३४७४७, अहमदाबाद – पंजाबी बिरादरी नवीन पुण्यानी – ९४२६०७८२००, गुरुद्वारा ठाकूर खुराणा – ९५७४०२९६१६, भोपाळ – पंजाबी समाज मोहनसिंग कालरा – ७०००४३२६०६, शशी वैद – ९३०७९४६६, इंदूर – पंजाबी समाज बलराज सबलोक – ९६४४४७१०९८, श्वेता खत्री – ७३५४६१९९६०, विजय ग्रोवर – ९४४४८७०९६०, नाशिक किरण कालरा – ८८०६१९४९६९, अशोक ग्रोवर – ९५२७४७२४७९, उत्तर प्रदेश उत्तर प्रदेश खत्री समाजाचे अध्यक्ष अचल महरोत्रा – ९५५५४११०९२, सिकंदराबाद गुरुद्वारा जाबा, नीर रेल्वे स्टेशन, सिकंदराबाद बलदेव बग्गा – ९८४८०४४४४४५, हैदराबाद गुरुद्वारा साहेब बहरामबाला, शीख छावणी, हैदराबाद सुखदेव सिंग – ९९४९६२२३३३३, पुणे कॅम्प पुणे गुरुद्वारा विक्रम सिंग कांड – ९९२२९३१८८०,हैदराबाद – पंजाबी सेवा समिती दीपक जेरत – ९८६६१२५५५५, कार्यालय – ८१२५७४९९६५, सुरत – पंजाबी समाज राधाकृष्ण मंदिर, गेटवे हॉटेलजवळ, ८१४००५५५८८, परवीन खन्ना – ९८२५५०००८८, कैलाश छाबडा – ९३७४७२१२८०, कोटा – पंजाबी समाज वीर वाधवा – ९४१४२२७१२७, रायपूर, छत्तीसगड – पंजाबी सनातन सभा श्रीनाथ कोहली कार्यालय – ९१११००२०९९ / ९१११००९७७१, अहिल्यानगर किशोर कंत्रोड – ८९९९८१२४०८ / ९२२६७८३१०१ मधुर मिलन मॅरेज ब्युरो (सोशल सर्व्हिस), किशोर प्रोव्हिजन स्टोअर, इंदिरा कॉलनी, तारकपूर, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा. या कार्यक्रमात नाव देऊन नातलगामध्ये होणाऱ्या अडचणी कमी करण्यासाठी व ज्यादा शहर न फिरता एक ठिकाणी येऊनी आपल्या जिवनसाथीची योग्य निवड करता यावी. व आयोजकांना समाजसेवेची संधी मिळावी, अशी माहिती, हरीष मदान, मोहन सिंग कालरा, सुरेंद्र वाधवा अरुण चोपडा, नरेंद्र सेतीजा, प्रेमनाथ सहानी, किशोर कंत्रोड, राजेंद्र कंत्रोड, प्रदिप पंजाबी यांच्यावतीने देण्यात येत आहे.

# सेंट सेव्हिअर्स हायस्कूलच्या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट

### १० सुवर्ण, ७ रौप्य आणि ६ कांस्यपदकांची कमाई

नगर – जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या विविध जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सेंट सेव्हिअर्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले. शाळेच्या खेळाडूंनी एकूण १० सुवर्ण, ७ रौप्य आणि ६ कांस्यपदकांची कमाई केली. मल्लखांब, योगासने, शूटिंग, कराटे, वुशू, तायक्वांदो, कॅरम आणि गोळाफेक आदी क्रीडाप्रकारांत खेळाडूंनी आपल्या कौशल्याची चमक दाखवली. विशेषतः १९ वर्षांखालील गटातील योगासन स्पर्धांमध्ये खेळाडूंनी सुवर्णपदकांची कमाई केली. तसेच १७ वर्षांखालील गटात कराटे, वुशू, शूटिंग आणि मल्लखांब या क्रीडाप्रकारांतही खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली.



जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या विविध जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवणारे सेंट सेव्हिअर्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या खेळाडू.

१४ वर्षांखालील मुला–मुलींच्या गटात आरेज मुजद्दीन सय्यद याने कराटे स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. अखिफा जहीर मुनावर हिने कराटे स्पर्धेत रौप्यपदक मिळविले, तर झिक्रा फैजान शेख हिने कराटेमध्ये कांस्यपदकाची कमाई केली. मुजम्मिल मुजसल याने कॅरम स्पर्धेत कांस्यपदक मिळवत आपले कौशल्य सिद्ध केले.

१७ वर्षांखालील मुला–मुलींच्या गटात सपुरा शेख हिने कराटे व वुशू या क्रीडाप्रकारांत सुवर्णपदके पटकावली. चैतन्य गंधाडे याने शूटिंग स्पर्धेत, तर सार्थक मस्के याने मल्लखांब स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले.

शेख उमान कुसुम वसीम याने तायक्वांदो व कराटे स्पर्धांमध्ये अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक मिळवून यश संपादन केले. तम्मिम सय्यद जावेद याने कराटे व वुशू स्पर्धांमध्ये रौप्य व कांस्यपदकांची कमाई केली. मुआज शेख याने कराटे व वुशू स्पर्धांमध्ये रौप्यपदक मिळवत शाळेच्या यशात भर घातली.

१९ वर्षांखालील मुला–मुलींच्या गटात सेंट सेव्हिअर्सच्या खेळाडूंनी विशेष चमक दाखविली. वेदांत क्षत्रिय याने गोळाफेक (शॉटपुट) स्पर्धेत रौप्यपदक मिळविले.

योगासन स्पर्धेत आरती पवार आणि आर्शिन शेख यांनी आर्टिस्टिक पेअर योगा प्रकारात सुवर्णपदक पटकावले. समायरा डाकुआ आणि खुशी लोंढे यांनी रिदमिक पेअर योगा प्रकारात सुवर्णपदक मिळविले. सार्थक झा आणि सोहम विधाते यांनी आर्टिस्टिक पेअर योगा प्रकारात सुवर्णपदकांची कमाई केली. स्तुती धुमाळ हिने ट्रॅडिशनल योगा प्रकारात रौप्यपदक, तर विशाल मुंढे याने याच प्रकारात कांस्यपदक मिळविले.

या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप काकडे, प्राचार्या ज्योत्स्ना शिंदे, पर्यवेक्षिका संध्या खरात, शिक्षिका प्रतिभा काकडे, जॉन सोनवणे आणि डेव्हिड पाटोळे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.



महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालय व केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर यांच्या संकल्पनेतून माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

# मेहेत्रे विद्यालयात माता पालक मेळावा उत्साहात

नगर – महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे सखाराम मेहेत्रे प्राथमिक विद्यालय व केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये संस्थेचे सचिव नामदेवराव गाडीलकर यांच्या संकल्पनेतून माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने मनोरंजक व बौद्धिक खेळ घेण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच हार्मोनियमवर पालक व विद्यार्थिनी यांनी प्रार्थना सादर केली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मनशक्तीच्या ज्येष्ठ साधक मीरा पठारे यांनी अवंतिका वेदवती व आईचे कौतुक केले. पालकांनी जबाबदारी ओळखली पाहिजे. मुले ही आपली संपत्ती आहे आणि ती जपायची आहे. कामावर जाणारी आणि गृहिणी स्त्री प्रत्येकाला आपलं मूल कसं असावा याबद्दल प्रश्न विचारून माता पालकांच्या विचारांना चालना दिली. मोबाईलवर काय पहावं काय ऐकावं याविषयी पालकांनी जागरूक असलं पाहिजे.

आपली मुले मोठ्यांना नमस्कार करतात का? आदराने वागवतात का याविषयी चर्चा केली सर्वांना समान वागणूक देण्यात यावी हेही त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले. तसेच त्यांनी प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी रुपये ११००० ची देणगी ग्रंथालयातील पुस्तके खरेदी करण्यासाठी भेट दिली. कार्यक्रमासाठी ताराताई मेहत्रे, मुख्याध्यापक अनिल गायकवाड, जयश्री लांडे व सर्व पालक प्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन जयश्री देशपांडे व मनीषा हिवाळे यांनी केले.



जागतिक वृत्तपत्र विक्रेता दिना निमित्त जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर वतीने बुरुडगांव रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे गेली ४० वर्षांपासून सेवा देणारे विक्रेते मच्छिंद्र गाली व शिवाजी सानप यांचा सत्कार करतांना जायंट्स वेलफेअर फौंडेशन चे सदस्य संजय गुगळे.

# ४० वर्षांपासून सेवा देणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांचा जायंटस् ग्रुप ऑफ अहिल्यानगरतर्फे सन्मान

नगर – राज्यात आज वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा होत आहे. माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त २०१७ पासून हा दिवस साजरा केला जातो. वाचन संस्कृती जपणाऱ्या व ऊन, वारा, पाऊस, थंडीची तमा न बाळगता पहाटे वाचकांपर्यंत वृत्तपत्र पोहोचविणाऱ्या विक्रेत्यांचा हा गौरव दिन आहे. या दिनाचे औचित्य साधून जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर व जायंट्स वेलफेअर फौंडेशनच्या वतीने बुरुडगांव रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. येथे गेली ४० वर्षांपासून अविरतपणे वृत्तपत्र विक्री व वितरणाची सेवा देणारे विक्रेते मच्छिंद्र गाली व शिवाजी सानप यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी जायंट्स वेलफेअर फौंडेशनचे सदस्य संजय गुगळे, सुरेश शिरसाठ, राजेंद्र पाचारणे, किशोर कुलट, वसंत गायकवाड, सुनील भिंगारदिवे उपस्थित होते.

# इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी

### थुंबा येथील डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटरला भेट देण्याची विद्यार्थ्यांना संधी




नगर – जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी, संशोधनवृत्ती वाढीस लागावी आणि अवकाश संशोधनाची ओळख व्हावी, या उद्देशाने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये केरळमधील थुंबा येथील डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येणार आहे. या सहलीसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता १८ ऑक्टोबर रोजी रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल, अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय निवड चाचणी घेण्यात आली. या परीक्षेला जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील एकूण २१० विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली या निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांनी परीक्षेचे नियोजन केले होते. जिल्हास्तरीय निवड चाचणीसाठी प्रत्येक तालुक्यातील पाचवी, सहावी आणि सातवी/आठवी या इयत्तांमधून तालुकास्तरीय निवड चाचणीत गुणानुक्रमे प्रथम आलेल्या प्रत्येकी पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यानुसार प्रत्येक तालुक्यातून १५ विद्यार्थी, असे जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधून एकूण २१० विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र ठरले. विशेष म्हणजे, निवड चाचणीसाठी पात्र ठरलेले सर्व २१० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते.

परीक्षेचे केंद्र संचालक म्हणून उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) मीना शिवगुंडे यांनी कामकाज पाहिले. शिक्षण विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख यांनी पर्यवेक्षणाची जबाबदारी सांभाळली. या जिल्हास्तरीय निवड चाचणीचा अंतिम निकाल २३ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यातून पाचवी, सहावी आणि सातवी/आठवी या इयत्तांमधील गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या प्रत्येकी एका विद्यार्थ्याची निवड केली जाणार आहे. त्यानुसार प्रत्येक तालुक्यातून तीन विद्यार्थी, असे जिल्ह्यातील १४ तालुक्यांतून एकूण ४२ विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहलीसाठी निवड होईल.

या शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवकाश संशोधन, विज्ञान–तंत्रज्ञान आणि इस्रोच्या कार्याची माहिती प्रत्यक्ष जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने अनेक वर्षांपासून जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी इस्रो शैक्षणिक सहलीचा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमासाठी घेतल्या जाणाऱ्या निवड चाचणीमुळे विद्यार्थ्यांच्या चिकित्सक वृत्तीला आणि सर्जनशीलतेला वाव मिळतो. तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आवड निर्माण होऊन निकोप स्पर्धेची भावना वाढीस लागते, अशी प्रतिक्रिया पालक विकास पांडुरंग लेंडे यांनी व्यक्त केली.

डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर, थुंबा, केरळ या ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहलीसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने राबविलेला उपक्रम स्तुत्य आणि विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व प्रेरणादायी असल्याचे मत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंप्री लोकाई, ता. राहाता येथील पदवीधर शिक्षक डॉ. संजय राठोड यांनी व्यक्त केले.

जिल्हास्तरीय निवड चाचणीसाठी निवड झाल्याचा आनंद व्यक्त करताना जिल्हा परिषद शाळा मिरजगाव मुली, ता. कर्जत येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी कु. श्रुती संतोष हजारे हिने या उपक्रमाबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया दिली. ती म्हणाली, या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी जागरूकता निर्माण होईल. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होऊन स्वतःमधील सर्जनशीलतेला वाव मिळेल. भविष्यात या सहलीचा अत्यंत उपयोग होईल, असा मला विश्वास आहे. निवड चाचणीचा पेपर सोपा गेला असून, या सहलीसाठी माझी निवड होईल, असा मला आत्मविश्वास आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### सकारात्मक विचारांची जादू

आपल्या आयुष्याची दिशा आपण कसा विचार करतो यावर अवलंबून असते. मनात जसे विचार येतात, तसेच आपले आयुष्य घडत जाते. आजच्या धावपळीच्या युगात पावलोपावली ताणतणाव आणि संकटांचा सामना करावा लागतो. अशा कठीण प्रसंगी मन सकारात्मक ठेवणे निरोगी आणि आनंदी जगण्यासाठी अत्यंत गरजेचे असते. सकारात्मक विचार म्हणजे आंधळा आशावाद नव्हे, तर जीवनातील वास्तव स्वीकारून प्रत्येक परिस्थितीतून मार्ग काढणे होय. 'हे माझ्याच बाबतीत का घडले?' असा विचार करण्याऐवजी 'या परिस्थितीतून मी काय शिकलो?' हा दृष्टिकोन ठेवणे म्हणजेच सकारात्मकता. नकारात्मक विचारांचा शरीरावर आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतो. याउलट, सकारात्मक विचार करणाऱ्या माणसाचे मन आणि शरीर निरोगी राहते ही सवय लावणे अवघड नाही. दिवसाची सुरुवात चांगल्या विचारांनी करावी. सतत तक्रार करण्याची सवय सोडून आपल्याकडे जे चांगले आहे, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी. नकारात्मक लोकांसांपासून दूर राहून उत्साही लोकांसोबत वेळ घालवावा. वाचन करणे किंवा निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याने मन ताजेतवाने होते. आयुष्य कसे जगायचे हे आपल्या विचारांवर ठरते. काळ्या ढगांमागे जसा सूर्य असतो, तसेच प्रत्येक संकटामागे एखादी संधी असते. मनाचा हा दृष्टिकोन बदलला की जग सुंदर दिसायला लागते.

## पाककला

### शेझवान मसाला वडापाव

**साहित्य :** उकडलेले बटाटे ४–५, आले–लसूण–मिरची पेस्ट १ चमचा, कढीपत्ता, मोहरी, हळद, हिंग, तेल, मीठ, कोथिंबीर, शेझवान चटणी २–३ चमचे, चिरलेला लसूण, बटर २ चमचे, बेसन १ कप, ओवा, खाण्याचा सोडा, पाणी, पाव.

**कृती :** प्रथम तेलात मोहरी, हिंग, कढीपत्ता, आले–लसूण–मिरची पेस्ट, हळद आणि कुस्करलेले बटाटे, मीठ, कोथिंबीर घालून भाजी परतून थंड करा व गोळे बनवा. पॅनमध्ये बटरवर लसूण व शेझवान चटणी परतून बटाट्याच्या गोळ्यात मिसळा. बेसनमध्ये ओवा, हळद, हिंग, मीठ, सोडा व पाणी घालून पीठ भिजवा. बटाट्याचे गोळे पिठात घोळवून तेलात सोनेरी तळून घ्या. पाव कापून त्यात शेझवान चटणी लावा, मध्ये वडा ठेवा व गरमागरम सर्व्ह करा.

## वास्तू

### सकारात्मकता राखण्यासाठी

* आठवड्यातून एकदा घरात गुग्गुळ किंवा साजूक तुपाचा व संताचा धूप दाखवावा याने वास्तुमध्ये सकारात्मकता येते.

* जेवणाला बसताना शक्यतो पूर्व किंवा उत्तर दिशेला तोंड असावे.

* नवीन वास्तूत प्रवेश केल्यानंतर घरात कधीही मोठ्या आवाजात भांडणे करू नयेत, गोड बोलण्याने वास्तू आनंदीत होते.

* घरातील कुंड्यांमध्ये असलेली रोपे सुकू देऊ नका, सुकलेली रोपे त्वरित काढून टाकावीत.

## सौंदर्य

केस गळण्याचे प्रमाण वाढले असेल, तर कांद्याचा रस आणि कढीपत्त्याची बारीक केलेली पेस्ट एकत्र करून डोक्याच्या त्वचेला लावा. यामुळे मुळांना ताकद मिळते आणि नवीन केस येण्यास मदत होते.

## सल्ला

* दुधात केसर मिसळण्यापूर्वी ते थोडे कुस्करून कोमट दुधात भिजत घातल्यास त्याचा रंग आणि सुवास खूप छान उतरतो.

* पातीचा कांदा चिरून ठेवण्याऐवजी मूळ स्वच्छ करून कागदात गुंडाळून ठेवावा, तो जास्त दिवस ताजा राहतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६

**दसरा, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, श्रवण १८।०२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात काही आव्हाने येऊ शकतात आणि आर्थिक व्यवहारांमध्ये सावध राहावे लागेल.

**वृषभ :** व्यवसायात मोठी आर्थिक प्रगती होईल आणि जुन्या मित्रांच्या भेटीमुळे मन प्रसन्न होईल.

**मिथुन :** विचारांवर नियंत्रण ठेवावे लागेल आणि नोकरीच्या ठिकाणी वरिष्ठांची मर्जी सांभाळावी लागेल.

**कर्क :** रखडलेली सर्व कामे पूर्ण होतील आणि सामाजिक क्षेत्रात मान–सन्मान वाढेल.

**सिंह :** अपेक्षेपेक्षा जास्त खर्च झाल्यामुळे आर्थिक ताण जाणवेल.

**कन्या :** कुटुंबातील सदस्यांचे सहकार्य लाभेल आणि व्यापाऱ्यांना चांगला नफा मिळेल.

**तुळ :** नवीन प्रकल्पावर काम सुरू होईल आणि आरोग्यामध्ये सकारात्मक बदल दिसून येईल.

**वृश्चिक :** मनात नकारात्मक विचार येऊ शकतात आणि नोकरीमध्ये बदल करण्याचे योग जुळून येत आहेत.

**धनु :** प्रत्येक कामात यश मिळेल आणि उच्च शिक्षणासाठी संधी मिळू शकते.

**मकर :** मेहनतीचे योग्य फळ मिळेल आणि मालमत्तेशी संबंधित जुने वाद मिटतील.

**कुंभ :** मित्रांच्या मदतीने महत्त्वाचे प्रश्न सुटतील आणि रखडलेले पैशांचे व्यवहार पूर्ण होतील.

**मीन :** गुंतवणुकीतून आर्थिक लाभ होईल आणि मन आध्यात्मिक विचारांकडे आकर्षित होईल.

## शब्दगंध क्र. ७५४० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :–** १) सप्ताहाचे; सात दिवसांचे; सात दिवसाला निघणारे वृत्तपत्र ४) विष्णूचा पाचवा अवतार; बुटका माणूस ६) व्यापारासाठी प्रसिद्ध असलेला एक समाज ८) वाळूवर किंवा कागदावर रेघा मारून शकुन पाहण्याची विद्या १०) लहान मूल; लेकरू ११) यश; जीत; सफलता १२) महाराष्ट्रातील एक समाज १३) कापडाचे एकखांबी घर १४) विशिष्ट समूह किंवा कंपू; ब्लॉक १५) सत्त्व; परीक्षा १७) जीव गेलेला; मेलेला २०) चिकट रस किंवा दूध २१) ऐट; नखरा २३) होम; अग्नीत आहुती टाकणे २४) ऋषी कपूर, जयाप्रदा यांचा गाजलेला एक हिंदी चित्रपट

**उभे शब्द :–** १) उसापासून बनणारा एक गोड पदार्थ २) उत्तर दिशेला असलेला मोठा पर्वत ३) सारा; महसूल हात; हस्त ४) गावाचाच भाग असलेली परंतु गावापासून थोडी दूरवर असलेली वस्ती ५) प्रत; अनुकरण; कॉपी ७) वाळूचे मैदान ९) कणखर; दणकट; बळकट १०) लहान; लघू; छोटा १३) खोगीर आवळण्याची वादी; घट्ट; गच्च १४) मोजणारा; गणना करणारा १६) सामुग्री; सामान १८) जुना; पुरातन १९) लढाई; युद्ध; रण; समर २२) नंतर; पुन्हा

### शब्दगंध क्र. ७५३९ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** मोठं होण्यासाठी शारिरीक उंची नाही, तर विचारांची आणि वागणुकीची उंची असावी लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आरसा वरची बाजू खाली उलटी करुन का दाखवत नाही?

आरसा आपली डावी बाजू उजवीकडे आणि उजवी बाजू डावीकडे उलटी करून दाखवतो, पण वरची बाजू खाली उलटी करत नाही, यामागचे वैज्ञानिक आणि मानवी मानसशास्त्राशी संबंधित सविस्तर कारण समजून घेऊया. सर्वात पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आरसा प्रत्यक्षात कोणतीही बाजू डावीकडून उजवीकडे बदलतच नसतो. आरशाचे काम अतिशय साधे असते; तो फक्त प्रकाश परावर्तित करून समोरच्या वस्तूची जशीच्या तशी हुबेहूब प्रतिकृती मागे फेकत असतो. जेव्हा आपण आरशासमोर उभे राहतो, तेव्हा उभी व्यक्ती आपला उजवा हात वर करते, तेव्हा आरशातील प्रतिमेचा उजवा हात देखील त्याच्या स्वतःच्या उजव्याच बाजूला असतो. मग आपल्याला असे का वाटते की डावी बाजू उजवी झाली? याचे उत्तर आपण वस्तू कशा पाहतो आणि समजून घेतो यामध्ये दडलेले आहे.

मानवी शरीररचना ही उभी आहे आणि आपण जगाकडे पाहताना नेहमी सरळ उभे राहतो. आपले शरीर बाह्य अंगाने डावीकडून उजवीकडे सममितीय नाही (म्हणजे डावा कान आणि उजवा कान एकसारखे दिसतात, पण डावा हात आणि उजवा हात वेगवेगळ्या दिशांना असतात). मात्र, वर आणि खाली या दिशेने आपले शरीर पूर्णपणे भिन्न असते; आपले डोके नेहमी वर असते आणि पाय नेहमी जमिनीवर खाली असतात. आपण कधीही स्वतःला एका चांदीच्या दोरीने जोडलेला असतो. पण ही तार किंवा दुसऱ्या माणसाला डोके खाली आणि पाय वर करून जगताना पाहिला नाही, कारण निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणामुळे ते अशक्य आहे.

जेव्हा आपण आरशासमोर उभे राहून स्वतःच्या प्रतिबिंबाकडे पाहतो, तेव्हा आपल्या मेंदूमध्ये एक नकळत प्रक्रिया घडते. आपण मानसिकदृष्ट्या स्वतःला त्या प्रतिमेच्या जागेवर जाऊन उभे राहण्याची कल्पना करतो. आता कल्पना करा की तुम्ही आरशातून बाहेर येऊन आरशाच्या पलीकडे जाऊन स्वतःच्याच तोंडासमोर उभे आहात असे करण्यासाठी तुम्हाला स्वतःला वळावे लागेल. जेव्हा तुम्ही स्वतःला वळवून समोरच्या व्यक्तीच्या समोर उभे राहता, तेव्हा तुमचा डावा हात समोरच्या व्यक्तीच्या उजव्या हातासमोर येतो. म्हणजेच, डावे आणि उजवे बदलल्यासारखे वाटणे हे आपल्या स्वतःला फिरवण्याच्या मानसिक प्रक्रियेमुळे होते.

पण जर तुम्ही स्वतःला तसेच फिरवून वरची बाजू खाली करण्याचा प्रयत्न केला, तर तुमचे डोके जमिनीवर जाईल आणि पाय हवेत जातील. हे आपल्या शरीराच्या रचनेच्या आणि निसर्गाच्या नियमांच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. आपले डोके नेहमी वरच राहावे अशी आपली शारीरिक रचना असल्यामुळे, मेंदू कधीही वरची बाजू खाली झाल्याचा विचारच करत नाही. मेंदू केवळ डावी आणि उजवी बाजू बदलल्याचा विचार स्वीकारतो, कारण माणसे स्वतःला आडवे न करता डावीकडून उजवीकडे सहज फिरवू शकतात.

या प्रक्रियेचा प्रत्यक्ष प्रयोग करून पाहिल्यास हा सर्व गोंधळ कसा मनाचा खेळ आहे हे स्पष्ट होते. समजा तुम्ही आरशासमोर उभे राहण्याऐवजी जमिनीवर पाठीवर झोपलात आणि आरसा तुमच्या अगदी डोक्यावर किंवा पायाजवळ धरला, तर काय होईल? या स्थितीत आरसा तुमची डावी किंवा उजवी बाजू बदलणार नाही, उलट तुमचे डोके आणि पाय यांची अदलाबदल झाल्यासारखे दाखवेल, कारण आता तुम्ही आडवे आहात आणि वर–खाली ही दिशा बदलली आहे.

यावरून हे स्पष्ट होते की आरसा स्वतःहून कोणतीही दिशा बदलत नाही. आपण ज्या उभ्या स्थितीत राहून जगाकडे बघतो आणि गोष्टींची तुलना करतो, तो आपला दृष्टिकोनच आरशात डावे–उजवे बदलल्याचा भास निर्माण करतो, तर वर–खाली दिशा बदलू देत नाही.

### शिष्टाचाराचे महत्त्व

एका सुंदर जंगलात 'हरितपूर' नावाचा एक टवटवीत परिसर होता. तिथे एक भव्य वडाचे झाड होते, ज्यावर अनेक पक्षी आणि प्राणी गुण्यागोविंदाने राहत होते. त्याच झाडाच्या ढोलीत 'चतुर' नावाचा एक हुशार पोपट राहत असे. तो नेहमी सर्वांशी गोड बोलत असे आणि सर्वांचा आदर करत असे.

त्याच जंगलात 'राकट' नावाचा एक उर्मट आणि गर्विष्ठ रानडुक्करही राहत होता. राकट कोणाशीही बोलताना नेहमी ताडकन, उर्मट भाषेत आणि उद्धटपणे बोलायचा. त्याला वाटायचे की, मोठ्याने बोलणे आणि सर्वांना धाकात ठेवणे म्हणजेच मोठेपणा!

एकदा जंगलात पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले. जंगलातील सर्व प्राणी तहान भागवण्यासाठी एकमेव उरलेल्या 'निर्मळ नदीच्या' काठावर पोहोचले. नदीच्या काठावर जागा खूप कमी होती. राकट तिथे आधीच पोहोचला होता आणि तो त्याच्या नेहमीच्या उद्धट स्वभावात म्हणाला, ऐका सगळे! इथे फक्त मी आधी आलोय, त्यामुळे पाणी मीच आधी पिणार. कोणाचा आवाज आला तर गाठ माझ्याशी आहे!

इतर प्राणी घाबरले आणि मागे सरकले. पण चतुर पोपट शांतपणे उडत तिथे आला. त्याने आदराने राकटला म्हटले, अरे राकट मित्रा, तहान सर्वांनाच सारखी लागली आहे. आपण सर्व मिळून शांततेने पाणी पिऊया, म्हणजे भांडण होणार नाही आणि सर्वांना पाणी मिळेल.

राकट रागाने ओरडला, चूप बस रे हिरव्या पिसाच्या! तू मला शहाणपणा शिकवणार का? मी कोणाचाही मान राखत नाही आणि मला कोणाची गरजही नाही! असे म्हणून राकट गर्वाने पाय आपटत पात्रात घुसला.

पण दुर्दैवाने, राकट ज्या खडकावर उभा राहून पाणी पीत होता, तो खडक सततच्या पावसामुळे निसरडा झाला होता. त्याच्या गर्वामुळे आणि तोल न सांभाळल्यामुळे तो पाय घसरून थेट खोल पाण्यात आणि चिखलात कोसळला. तो चिखलात अडकला आणि मदतीसाठी ओरडू लागला, वाचवा! मला कोणीतरी बाहेर काढा!

नदीकाठी उभे असलेले सर्व प्राणी एकमेकांकडे पाहू लागले. कोणालाही त्या उर्मट आणि ताठर प्राण्याला मदत करण्याची इच्छा नव्हती. पण चतुर पोपटाने भूतदया दाखवली. तो इतर पक्षांना म्हणाला, मित्रांनो, तो संकटात आहे. आपण आपली माणुसकी सोडता कामा नये. चतुरने ताबडतोब जंगलातील इतर मोठ्या प्राण्यांना बोलावून आणले आणि सर्वांनी मिळून राकटला सुखरूप बाहेर काढले.

पाण्यातून बाहेर आल्यावर राकटचे संपूर्ण शरीर चिखलाने माखले होते आणि त्याची गर्दी जिरली होती. त्याला आपली चूक समजली. त्याने मान खाली घालून चतुर पोपटाची आणि इतर प्राण्यांची क्षमा मागितली आणि म्हणाला, माझी भाषा आणि माझा उर्मट स्वभाव यामुळे आज माझा हा दुर्दैवी प्रसंग ओढवला होता. मला माफ करा, मी आजपासून सर्वांशी प्रेमाने आणि आदराने बोलेन. त्यानंतर राकट कधीही कोणाशी ताडकन किंवा उर्मटपणे बोलला नाही.

बोध : गोड आणि नम्र शब्द हे माणसाचे खरे दागिने असतात. उद्धटपणा आणि ताठर भूमिका माणसाला संकटात ढकलतात, तर आदरयुक्त आणि शिष्टाचाराने वागल्यामुळे कठीण प्रसंगातही सर्वांची साथ लाभते.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

ही अति उच्च कोटीची ज्योती व धुनी ही त्याचे आणि बाह्य जगातील ज्योती आणि धुनी ही त्याचे प्रतिबिंब आहे.आत्मस्वरूपात हा बाह्य विश्वातील १६ सूर्यांच्या प्रकाशापेक्षाही जास्त तेज असते. परंतु ते तापदायक व ज्वलनशील नसते. ते थंडावा देणारे आणि प्रेमाने पुरेपूर भरलेले असते. आत्मस्वरूपात अशा भव्य दिव्य नाद लहरी निनादात ज्या आम्ही बाह्य कानांनी ऐकू शकत नाही.आमचा आत्मा शरीराशी एका चांदीच्या दोरीने जोडलेला असतो. पण ही तार आपण पाहू शकत नाही. संत, महापुरुषांनी या तारेचे वर्णन केले आहे. ही एक चकाकणारी तार आहे जी आत्म्याला शरीराच्यावर उचावरही व अंतरीय मंडळात जाण्या–येण्यासाठी उपयोगी पडते. मृत्युसमयी ही चांदी तार तोडली जाते. जेणेकरून आत्म्याने पुन्हा या शरीरात प्रवेश करू नये. परंतु जेव्हा आपण ध्यान अभ्यासामध्ये बसतो तेव्हा ती तार तुटत नाही. त्यामुळे देहत्यागाच्यावर आत्म्यानंतर पुन्हा आत्मा पुन्हा शरीरात प्रवेश करू शकतो. आमच्या आत्म्याचे बाह्य स्वरूप 'ध्यान' आहे. आमचे ध्यान आमच्या शरीरभर पसरलेले असते. आत्मा हाच शरीराला प्राण प्रदान करतो. ज्या शरीरात आत्मा नसतो, व ज्याची चंदेरी तार तुटलेली असते ते शरीर मृत असते. आत्म्याचे स्थान दोन्ही भुवयांच्या मधोमध असते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय :

जर माझ्या मुलीने पहिल्यांदाच केक केला आणि माझं मत विचारलं आणि तो चांगला झालेला नसतानाही मी तिचं कौतुक केलं तर ते खोटं असेल?

शिवानीदीदी :

जेव्हा तुम्ही विचार एक करता आणि बोलता दुसरंच तेव्हा ते खोटं असतं.

सुरेश ओबेरॉय :

तिचं कौतुक करण्यामागे तिला प्रेरणा देणं हा हेतू होता नाही तर ती निराश झाली असती.

शिवानीदीदी :

बरोबर. आपण इतरांना प्रोत्साहन द्यायला हवं, प्रेरणा द्यायला हवी, त्यांचं कौतुक करायला हवं. पण आपण आपल्या विचारांशी आणि शब्दांशी प्रामाणिक राहायला हवं.

उदाहरणार्थ, जर आपल्याला एखाद्याचा ड्रेस आवडला नाही तर तो माझ्या आवडीप्रमाणे चांगला नसेल, पण त्या व्यक्तीच्या आवडीचा असेल, असा विचार निर्माण करायला हवा. नाही तर आपण, तुमच्या आवडीप्रमाणे हा ड्रेस तुमच्यासाठी छान आहे, अशा शब्दांत प्रामाणिकपणे कौतुक करू शकतो. या मार्गाने आपल्याला आपल्या विचारांत आणि शब्दांत सुसंगती साधता येईल.

पण जर, किती वाईट पसंती आहे, असा विचार करून, तुमची निवड चांगली आहे, असं म्हणत असू तर ते धोकादायक आहे. आपल्या शब्दांत आणि आपल्या विचारांत विरोधाभास आहे. आपण समोरच्याला दोन संदेश पाठवत आहोत. सुरेश ओबेरॉय : आपण प्रेमस्वरूप असण्याच्या मूळ स्वभावापासून लांब जाण्यामागे हेच कारण आहे का?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, आज या आरशात मी खूपच बारीक दिसतेय!

नवरा (घाबरून) : अगं भाग्यवान, तो आरसा नाही, मोबाईलचा फ्रंट कॅमेरा आहे, तो प्रत्येकाला असाच दाखवतो!

## करूया स्पर्धा परिक्षांची तयारी

* क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश कोणता आहे?

– रशिया

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४८९१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

२) विरेचन : औषधीयुक्तद्रव्ये देऊन प्रकुपित झालेले दोष जुलाबावाटे बाहेर काढण्याच्या क्रियेला विरेचन असे म्हणतात. शरीराच्या अधोभागातील दोष तसेच पित्त प्रकुपित दोष शरीराबाहेर काढण्यासाठी विरेचनाचा उपयोग होतो.

३) बस्ती : या चिकित्सेला आयुर्वेदामध्ये सर्व चिकित्सांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. यामध्ये वात प्रकुपित दोष शरीराबाहेर काढले जातात. औषधीयुक्त द्रव्यांचा / तेलाचा एनिमा घेणे म्हणजे बस्ती होय.

४) नस्य : शिरोभागातील (डोके) आजार बरे करण्यासाठी नस्याचा उपयोग होतो. यामध्ये औषधीयुक्त तेलाचे थेंब नाकामध्ये टाकले जातात.

५) रक्तमोक्षण :

त्वचागत रोग बरे करण्यासाठी तसेच रस, रक्त धातूंमधील विकार बरे करण्यासाठी रक्तमोक्षणाचा उपयोग होतो. यामध्ये शिरेद्वारे, जळवाद्वारे त्वचेतील दूषित रक्त बाहेर काढले जाते.स्त्रियांमध्ये उत्तरबस्ती : स्त्रीबीज तयार न होणे, गर्भनलिका बंद असणे, गर्भाशयाच्या आतील स्तर पातळ असणे या विकारांवर उत्तरबस्ती उपयोगी पडते. पुरुषांमध्ये उत्तरबस्ती : शुक्रजंतूंची हालचाल नसणे, शुक्रजंतू कमी असणे किंवा अजिबातच नसणे यामध्ये उपयोग होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं– ८७९३४००४००

# अर्थजगत




## ऑक्टोबरमधील करजबाबदारी

**ऑक्टोबर महिना प्राप्तिकराच्या दृष्टीने करदाते, व्यावसायिक आणि कंपन्यांसाठी महत्त्वाचा आहे. प्राप्तिकर विवरणपत्रे, टीडीएस-टीसीएसची तिमाही विवरणपत्रे, कर लेखापरीक्षणाशी संबंधित कागदपत्रे आणि नव्या फॉर्मच्या पूर्ततेसाठी या महिन्यात अनेक मुदती आहेत. विशेष म्हणजे १ एप्रिल २०२६ पासून नवा प्राप्तिकर कायदा लागू झाल्यामुळे जुन्या आणि नव्या कायद्यातील तरतुदींचा विचार करून संबंधित कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. निर्धारित मुदतींकडे दुर्लक्ष झाल्यास व्याज, दंड किंवा इतर कायदेशीर अडचणी निर्माण होऊ शकतात.**

**■ ७ ऑक्टोबरची मुदत संपली; पुढील तारखा महत्त्वाच्या**
सप्टेंबर २०२६ मध्ये कापलेला स्रोतावरील कर अर्थात टीडीएस आणि संकलित केलेला टीसीएस सरकारी खात्यात जमा करण्याची सर्वसाधारण अंतिम तारीख ७ ऑक्टोबर होती. ही मुदत आता संपली आहे. मात्र, काही विशिष्ट व्यवहारांसाठी स्वतंत्र नियम लागू आहेत.
यामध्ये मालमत्ता खरेदी, विशिष्ट भाडे व्यवहार, कंत्राटदार किंवा व्यावसायिकांना केलेली देयके आणि आभासी डिजिटल मालमत्तांच्या हस्तांतरणाशी संबंधित व्यवहारांचा समावेश होतो.

**■ फॉर्म-१४१ साठी : ३० ऑक्टोबर**
नव्या प्राप्तिकर कायद्यांतर्गत 'फॉर्म-१४१' हा एकत्रित चलन तथा विवरणपत्राचा नवा फॉर्म लागू करण्यात आला आहे. यापूर्वी वापरले जाणारे फॉर्म २६क्यूबी, २६क्यूसी, २६क्यूडी आणि २६क्यूई यांची जागा या फॉर्मने घेतली आहे.
सप्टेंबरमध्ये संबंधित व्यवहारांवर टीडीएस कापला असल्यास फॉर्म-१४१ सादर करण्याची आणि कर जमा करण्याची अंतिम तारीख ३० ऑक्टोबर आहे. हा फॉर्म प्राप्तिकर विभागाच्या ई-फायलिंग पोर्टलवर सादर करावा लागेल. याशिवाय १५ ऑक्टोबर रोजी फॉर्म-१३२, फॉर्म-१४७ आणि फॉर्म-१४८ यांसारख्या विशिष्ट विवरणपत्रांसाठीही मुदत आहे. हे फॉर्म प्रामुख्याने संबंधित व्यवहार करणाऱ्या संस्था आणि व्यावसायिकांसाठी लागू होतात.

**■ प्राप्तिकर विवरणपत्रासाठी ३१ ऑक्टोबर**
ज्या करदात्यांच्या खात्यांचे लेखापरीक्षण आवश्यक आहे, त्यांच्यासाठी मूल्यांकन वर्ष २०२६-२७ चे प्राप्तिकर विवरणपत्र सादर करण्याची नमूद अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर आहे. हे विवरणपत्र आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील उत्पन्नाशी संबंधित आहे.
या वर्षाचे विवरणपत्र जुन्या प्राप्तिकर कायदा, १९६१ नुसारच सादर करायचे आहे. संबंधित लेखापरीक्षण अहवालासाठी ३० सप्टेंबरची मुदत होती. हस्तांतरण किंमत निर्धारणाच्या नियमांत येणाऱ्या करदात्यांना प्राप्तिकर विवरणपत्रासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत आहे. मात्र, त्यांचा फॉर्म-३सीईबी लेखापरीक्षण अहवाल ३१ ऑक्टोबरपर्यंत सादर करावा लागणार आहे.

**■ तिमाही विवरणपत्रांचीही मुदत**
जुलै ते सप्टेंबर २०२६ या तिमाहीतील टीडीएस आणि टीसीएस विवरणपत्रांसाठी ३१ ऑक्टोबर महत्त्वाचा आहे. वेतन आणि संबंधित देयकांवरील टीडीएससाठी फॉर्म-१३८, वेतनाव्यतिरिक्त रहिवासी व्यक्तींना केलेल्या देयकांसाठी फॉर्म-१४०, टीसीएससाठी फॉर्म-१४३ आणि अनिवासी व्यक्तींना केलेल्या विशिष्ट देयकांसाठी फॉर्म-१४४ लागू होतो.
आभासी डिजिटल मालमत्तेच्या व्यवहारांशी संबंधित पात्र एक्स्चेंजसाठी फॉर्म-१४२ महत्त्वाचा आहे.

**■ जुन्या-नव्या कायद्याचा गोंधळ टाळा**
आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील उत्पन्नासाठी जुन्या कायद्यानुसार विवरणपत्र सादर करावे लागते, तर कर वर्ष २०२६-२७ मधील संबंधित व्यवहारांसाठी नव्या कायद्यातील फॉर्म आणि तरतुदी लागू होतात.
करदात्यांनी आपल्या व्यवहाराचा प्रकार, लागू फॉर्म आणि अंतिम मुदत यांची खात्री करणे आवश्यक आहे. विशेषतः ३१ ऑक्टोबरच्या मुदतीबाबत कोणतीही सरकारी मुदतवाढ जाहीर झाली आहे का, हेही तपासावे. प्रत्येक मुदत सर्व करदात्यांना लागू होत नसल्यामुळे आपल्या श्रेणीनुसार कर अनुपालनाचे नियोजन करणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

**घर खरेदी करताना प्रत्यक्ष व्यवहाराची किंमत आणि सरकारने मुद्रांक शुल्कासाठी निश्चित केलेले मूल्य यांमध्ये मोठी तफावत असल्यास प्राप्तिकर विभागाकडून चौकशी होऊ शकते.**

## ६० लाखांचा फ्लॅट खरेदी केला, प्राप्तिकराची ३५ लाखांची नोटीस!

मुंबईतील एका व्यक्तीने पत्नीसह सुमारे ६० लाख रुपयांना फ्लॅट खरेदी केला. मात्र, त्या मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासाठीचे मूल्य ९४.८१ लाख रुपये असल्याने प्राप्तिकर विभागाने तब्बल ३४.८१ लाख रुपयांची तफावत करपात्र उत्पन्नात समाविष्ट केली. या प्रकरणात मुंबई प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय घरखरेदीदारांसाठी महत्त्वाचा ठरला आहे.

**■ नेमके प्रकरण काय?**
मुंबईतील चेंबूर परिसरात राहणाऱ्या श्यामसुंदर बन्सीधर रिंगुसिया यांनी ऑगस्ट २०१७ मध्ये पत्नीसह फ्लॅट खरेदी केला. या मालमत्तेत पत्नीचा ५८.९२ टक्के, तर पतीचा ४१.०८ टक्के मालकीहिस्सा होता.
फ्लॅटची खरेदी किंमत सुमारे ६० लाख रुपये असताना मुद्रांक शुल्क विभागाने त्याचे मूल्य ९४.८१ लाख रुपये निश्चित केले होते. त्यामुळे दोन्ही रकमांमधील ३४.८१ लाख रुपयांची तफावत प्राप्तिकर विभागाने प्राप्तिकर कायद्याच्या कलम ५६(२)(१०)(बी) अंतर्गत पतीच्या उत्पन्नात समाविष्ट केली.
विशेष म्हणजे मालमत्तेत पतीचा हिस्सा केवळ ४१.०८ टक्के असूनही संपूर्ण तफावत त्यांच्याच उत्पन्नात समाविष्ट करण्यात आली. पत्नीच्या उत्पन्नाची स्वतंत्र चौकशी झालेली नसल्याचे कारण यासाठी देण्यात आले.

■ अर्थ विशेष




**■ कमी किमतीमागील कारण काय?**
घरखरेदीदाराने स्पष्ट केले की, संबंधित इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र अर्थात 'ओसी' मिळालेले नव्हते. तसेच काही मूलभूत सुविधाही उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे फ्लॅटची प्रत्यक्ष बाजारातील किंमत मुद्रांक शुल्कासाठी निश्चित केलेल्या मूल्यापेक्षा कमी होती. त्यांनी प्राप्तिकर विभागाकडे मालमत्तेचे स्वतंत्र मूल्यांकन करण्याची मागणी केली होती. मात्र, विभागाने ती स्वीकारली नाही. अखेर त्यांनी प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणात दाद मागितली.

**■ न्यायाधिकरणाने काय स्पष्ट केले?**
न्यायाधिकरणाने नमूद केले की, करदात्याने मुद्रांक शुल्कासाठीच्या मूल्यावर विश्वासार्ह पुराव्यांसह आक्षेप घेतल्यास प्राप्तिकर अधिकाऱ्यांनी त्या आक्षेपाची योग्य तपासणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागीय मूल्यांकन अधिकाऱ्याकडून स्वतंत्र मूल्यांकन करून घेण्याच्या मागणीचाही विचार करावा लागतो. तसेच संयुक्त मालकीच्या मालमत्तेतील संपूर्ण मूल्यतफावत एका सहमालकाच्या उत्पन्नात समाविष्ट करता येणार नाही. प्रत्येकाच्या मालकीहिश्श्यानुसारच संभाव्य करदायित्व निश्चित करावे लागेल.
न्यायाधिकरणाने ३४.८१ लाख रुपयांची करआकारणी अंतिमतः रद्द केलेली नाही. पूर्वीचा आदेश बाजूला ठेवून प्रकरण नव्याने तपासण्यासाठी प्राप्तिकर अधिकाऱ्याकडे परत पाठविले आहे. मुद्रांक शुल्कासाठी निश्चित केलेले मूल्य हेच मालमत्तेचे अंतिम करनिर्धारण मूल्य असेलच असे नाही. मात्र, कमी किमतीत घर खरेदी केल्याने करातून आपोआप सूट मिळत नाही. त्यासाठी योग्य कागदपत्रे आणि विश्वासार्ह पुरावे सादर करणे आवश्यक आहे.

### घरखरेदीदारांनी काय काळजी घ्यावी?
मालमत्तेची प्रत्यक्ष खरेदी किंमत सरकारी मूल्यांकनापेक्षा कमी असल्यास त्यामागील कारणांचे पुरावे जपणे आवश्यक आहे. खरेदी करार, बांधकाम व्यावसायिकाशी झालेला पत्रव्यवहार, भोगवटा प्रमाणपत्राचा अभाव, अपुऱ्या सुविधा, मालमत्तेची छायाचित्रे आणि स्वतंत्र मूल्यांकन अहवाल उपयोगी ठरू शकतात.

## वडिलोपार्जित दागिन्यांवरही प्राप्तिकराची नोटीस?

वडिलोपार्जित सोन्याचे दागिने ही अनेक कुटुंबांची मौल्यवान संपत्ती असते. पिढ्यान्पिढ्या जपलेल्या या दागिन्यांच्या खरेदीच्या पावत्या अनेकदा उपलब्ध नसतात. मात्र, प्राप्तिकर विवरणपत्रात अशा दागिन्यांची माहिती दिल्यानंतर प्राप्तिकर विभागाकडून त्यांच्या मालकीबाबत विचारणा झाल्यास काय करायचे? मुंबईतील एका महिलेच्या प्रकरणात प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणाने दिलेला निर्णय यासंदर्भात महत्त्वाचा ठरला आहे. तब्बल ६७.४० लाख रुपयांच्या वडिलोपार्जित दागिन्यांवरील कर आकारणी रद्द करताना न्यायाधिकरणाने जुन्या कागदपत्रांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

**■ नेमके प्रकरण काय?**
मुंबईतील विलेपार्ले परिसरात राहणाऱ्या पारिख यांनी प्राप्तिकर विवरणपत्रातील 'शेड्यूल एएल'मध्ये प्रथमच ६७.४० लाख रुपये मूल्याच्या दागिन्यांची नोंद केली होती. यापूर्वी त्यांनी १९९७-९८ या मूल्यांकन वर्षासाठी संपत्तीकर विवरणपत्रात दागिन्यांची माहिती दिली होती. त्यानंतर मात्र संपत्तीकर विवरणपत्रे दाखल केली नव्हती.
त्यामुळे हे दागिने पूर्वी विकले गेले असावेत आणि आता दाखवलेले दागिने अघोषित संपत्ती असावी, असा संशय प्राप्तिकर विभागाला आला. विभागाने प्राप्तिकर कायद्याच्या कलम ६९ए अंतर्गत दागिन्यांचे मूल्य अस्पष्टीकृत संपत्ती म्हणून उत्पन्नात समाविष्ट केले.

**■ जुन्या नोंदी ठरल्या निर्णायक**
पारिख यांनी संबंधित दागिने सासरे, सासू आणि हिंदू अविभक्त कुटुंबाकडून वारसाहक्काने मिळाल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या समर्थनार्थ १९८९ पासूनचे दागिन्यांचे मूल्यांकन अहवाल, जुनी संपत्तीकर विवरणपत्रे आणि २०१५ मधील कौटुंबिक वाटणीची कागदपत्रे सादर केली. १९९७-९८ च्या संपत्तीकर विवरणपत्रातही १९.५५ लाख रुपयांच्या दागिन्यांची नोंद होती. नोंदणीकृत



मूल्यांकनकर्त्याच्या अहवालानुसार जुन्या नोंदींमधील दागिन्यांच्या प्रमाणात महत्त्वपूर्ण बदल झालेला नव्हता.
मुंबई प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणाने १ सप्टेंबर २०२६ रोजी निर्णय देताना स्पष्ट केले की, केवळ नंतरची संपत्तीकर विवरणपत्रे दाखल केलेली नाहीत म्हणून दागिने विकल्याचा निष्कर्ष काढता येणार नाही. विक्रीचा स्वतंत्र पुरावा विभागाकडे नव्हता. त्यामुळे ६७.४० लाख रुपयांची संपूर्ण वाढीव करआकारणी रद्द करण्यात आली.
दलालीच्या दाव्याला मात्र नकार
याच प्रकरणात मालमत्ता व्यवहारातील १२ लाख रुपयांच्या दलालीचा दावा न्यायाधिकरणाने अमान्य केला. संबंधित हिंदू अविभक्त कुटुंबाने स्वतंत्र दलाली सेवा पुरवल्याचा पुरावा उपलब्ध नव्हता. केवळ पैसे दिल्याची पावती म्हणजे संबंधित खर्च करपात्र उत्पन्नातून वजा करण्यास पात्र ठरतो, असे नाही, हेही स्पष्ट झाले.

**■ कोणती कागदपत्रे जपावीत?**
वडिलोपार्जित दागिन्यांच्या बाबतीत मृत्युपत्र, वारसाहक्क प्रमाणपत्र, कौटुंबिक वाटणीपत्र आणि जुनी संपत्तीकर विवरणपत्रे सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. दागिन्यांचे वजन, शुद्धता, छायाचित्रे आणि मूल्य नमूद असलेला नोंदणीकृत मूल्यांकनकर्त्याचा अहवालही उपयोगी ठरतो. सध्याच्या नियमानुसार एकूण उत्पन्न १ कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्यास लागू असलेल्या प्राप्तिकर विवरणपत्रात 'शेड्यूल एएल'द्वारे मालमत्ता आणि दायित्वांची माहिती देणे आवश्यक असते.

## परदेशातील क्रिप्टो गुंतवणूक लपवली आहे?




परदेशातील क्रिप्टोकरन्सी एक्स्चेंजवर गुंतवणूक करणाऱ्या भारतीय करदात्यांसाठी एक महत्त्वाची संधी उपलब्ध झाली आहे. परदेशातील मालमत्ता किंवा त्यातून मिळालेले उत्पन्न प्राप्तिकर विवरणपत्रात जाहीर केलेले नसल्यास गंभीर करदायित्व आणि कायदेशीर कारवाईचा धोका निर्माण होऊ शकतो. अशा करदात्यांसाठी 'फॉरेन ॲसेट्स ऑफ स्मॉल टॅक्सपेयर्स ह डिस्क्लोजर स्कीम २०२६' अर्थात 'फास्ट-डीएस २०२६' ही योजना महत्त्वाची ठरू शकते. या योजनेत काही अटींच्या अधीन राहून पूर्वी जाहीर न केलेली परदेशी मालमत्ता किंवा उत्पन्न घोषित करण्याची तरतूद आहे.

**■ प्रत्येक क्रिप्टो गुंतवणूक परदेशी मालमत्ता नाही** : क्रिप्टोकरन्सी ही डिजिटल मालमत्ता असली, तरी तिची खरेदी कोणत्या एक्स्चेंजवर केली आहे, मालकी कोणाकडे आहे आणि गुंतवणुकीसाठी पैसा कोठून आला, याला कराच्या दृष्टीने महत्त्व आहे.
भारतातील प्लॅटफॉर्मवरील गुंतवणूक आणि परदेशी एक्स्चेंजवरील गुंतवणूक यांचे नियम वेगळे असू शकतात. परदेशी प्लॅटफॉर्मवरील क्रिप्टो गुंतवणूक काही परिस्थितींमध्ये प्राप्तिकर विवरणपत्रातील 'शेड्यूल एफए' अंतर्गत जाहीर करावी लागू शकते. मात्र, प्रत्येक परदेशी प्लॅटफॉर्मवरील गुंतवणूक आपोआप अघोषित परदेशी मालमत्ता ठरत नाही.

**■ ५ कोटी रुपयांची मर्यादा कोणासाठी?** : या योजनेतील 'कॅटेगरी बी' अशा करदात्यांसाठी महत्त्वाची आहे, ज्यांनी आधीच कर भरलेल्या किंवा जाहीर केलेल्या उत्पन्नातून परदेशात मालमत्ता खरेदी केली; परंतु त्या मालमत्तेची आवश्यक माहिती प्राप्तिकर विवरणपत्रात दिली नाही.
या प्रकारात ३१ मार्च २०२६ रोजी संबंधित परदेशी मालमत्तेचे एकत्रित वाजवी बाजारमूल्य ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक नसल्यास १ लाख रुपयांचे निश्चित शुल्क भरून मालमत्ता घोषित करण्याची तरतूद आहे.

**■ १ कोटी रुपयांची मर्यादा कोणासाठी?** : 'कॅटेगरी ए'मध्ये जाहीर न केलेल्या उत्पन्नातून खरेदी केलेल्या परदेशी मालमत्तेचा किंवा अघोषित परदेशी उत्पन्नाचा समावेश होऊ शकतो. उदाहरणार्थ, कर न भरलेल्या फ्रीलान्सिंग उत्पन्नातून क्रिप्टो खरेदी करणे किंवा क्रिप्टोच्या व्यवहारातून मिळालेला नफा जाहीर न करणे.
या प्रकारात निर्धारित अटींनुसार १ कोटी रुपयांची एकत्रित मर्यादा लागू होते. संबंधित रकमेवर ३० टक्के कर आणि त्या कराच्या १०० टक्के दंडामुळे एकूण प्रभावी देयता ६० टक्क्यांपर्यंत जाते. अनेक परदेशी मालमत्ता असल्यास प्रत्येकाची मर्यादा स्वतंत्रपणे न पाहता एकत्रित मूल्य विचारात घेतले जाते.

**■ क्रिप्टोचे मूल्य कसे ठरवणार?** : क्रिप्टोकरन्सीच्या मूल्यांकनासाठी स्वतंत्र पद्धत स्पष्टपणे निर्धारित केलेली नसल्याने अडचणी निर्माण होऊ शकतात. उपलब्ध तरतुदींच्या अर्थानुसार खरेदी खर्च किंवा ३१ मार्च २०२६ रोजी खुल्या बाजारात मिळू शकणारे मूल्य यांपैकी अधिक मूल्य विचारात घेतले जाऊ शकते.त्यामुळे एक्स्चेंजवरील व्यवहारांची नोंद, डिजिटल वॉलेटमधील शिल्लक, बँक स्टेटमेंट, खरेदीची तारीख आणि गुंतवणुकीसाठी वापरलेल्या पैशाचा स्रोत यांची कागदपत्रे सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

**■ कायदेशीर संरक्षण किती?** : योजनेच्या अटी पूर्ण करून वैध घोषणा केल्यास संबंधित मालमत्ता किंवा उत्पन्नाबाबत काळा पैसा कायद्यांतर्गत पुढील कर, दंड आणि खटल्यापासून संरक्षण मिळू शकते. मात्र, हे संरक्षण घोषणेत समाविष्ट केलेल्या मालमत्तेपुरतेच मर्यादित असते.
महत्त्वाचे म्हणजे या योजनेतून परकीय चलन व्यवस्थापन कायद्यांतर्गत अर्थात 'फेमा' अंतर्गत संभाव्य कारवाईपासून आपोआप संरक्षण मिळत नाही. त्यामुळे परदेशी क्रिप्टो गुंतवणूक जाहीर करण्यापूर्वी उत्पन्नाचा स्रोत, कर भरल्याची स्थिती, मालमत्तेचे मूल्य आणि लागू कायदेशीर अटी तपासणे आवश्यक आहे. चुकीच्या वर्गवारीमुळे अतिरिक्त करदायित्व निर्माण होऊ शकते. गुंतागुंतीच्या व्यवहारांमध्ये करसल्लागाराचे मार्गदर्शन घेणे हितावह ठरेल.

## आधार कार्ड नसले तरी पेन्शन बंद होणार नाही!

निवृत्तीनंतर अनेक ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन हा उत्पन्नाचा प्रमुख आधार असतो. ही पेन्शन नियमित सुरू राहण्यासाठी दरवर्षी हयातीचा दाखला अर्थात 'लाइफ सर्टिफिकेट' सादर करावा लागतो. मात्र, आधार कार्ड नसल्यास किंवा आधार क्रमांक पेन्शन खात्याशी जोडलेला नसल्यास पेन्शन बंद होईल, अशी भीती अनेक निवृत्तिवेतनधारकांना वाटते.
प्रत्यक्षात सर्व प्रकारच्या पेन्शनसाठी आधार कार्ड अनिवार्य नाही. पेन्शन योजनेनुसार हयातीचा दाखला सादर करण्याचे वेगवेगळे पर्याय उपलब्ध आहेत.

**■ डिजिटल प्रमाणपत्रासाठी आधार आवश्यक** : केंद्र सरकारच्या 'जीवन प्रमाण' या डिजिटल सुविधेद्वारे निवृत्तिवेतनधारक घरबसल्या हयातीचा दाखला सादर करू शकतात. या सुविधेसाठी आधार आधारित प्रमाणीकरण आवश्यक असते. बोटांचे ठसे, डोळ्यांच्या बुबुळांचे स्कॅनिंग किंवा चेहऱ्याची ओळख पटविण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल प्रमाणपत्र तयार केले जाते.
त्यामुळे आधार क्रमांक नसल्यास या विशिष्ट डिजिटल सुविधेचा लाभ घेता येत नाही. मात्र, त्याचा अर्थ संबंधित व्यक्तीला पेन्शन मिळणार नाही, असा होत नाही.

**■ प्रत्यक्ष दाखला देण्याची सुविधा**



केंद्र सरकारी निवृत्तिवेतनधारकांना पेन्शन वितरित करणाऱ्या बँकेत किंवा संबंधित संस्थेत प्रत्यक्ष उपस्थित राहून हयातीचा दाखला सादर करता येतो. आजारपण किंवा शारीरिक असमर्थतेमुळे प्रत्यक्ष जाणे शक्य नसल्यास निर्धारित अधिकाऱ्याने प्रमाणित केलेला दाखलाही स्वीकारला जाऊ शकतो. त्यामुळे डिजिटल पद्धतीचा वापर करता येत नसलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहे.

**■ ईपीएफओ पेन्शनधारकांसाठी पर्याय**
कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या कर्मचारी पेन्शन योजनेतील निवृत्तिवेतनधारकांनाही आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरणाशिवाय हयातीचा दाखला सादर करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. संबंधित पेन्शन वितरित करणाऱ्या बँकेमार्फत हयातीचा दाखला किंवा लागू असल्यास पुनर्विवाह न केल्याचे प्रमाणपत्र सादर करता येते. त्यासाठी बँक व्यवस्थापक किंवा राजपत्रित अधिकाऱ्याचे प्रमाणीकरण ग्राह्य धरले जाऊ शकते.

**■ घरपोच सुविधेची अट**
इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेमार्फत डिजिटल हयातीचा दाखला घरपोच उपलब्ध करून देण्याची सुविधाही आहे. मात्र, त्यासाठी आधार क्रमांक, मोबाइल क्रमांक आणि पेन्शन वितरित करणाऱ्या संस्थेकडे आधारची पूर्वनोंदणी आवश्यक असते. आधार नसलेल्या व्यक्तींना या डिजिटल घरपोच सुविधेचा वापर करता येणार नाही.

**■ मुदतीकडे दुर्लक्ष नको**
केंद्र सरकारी निवृत्तिवेतनधारकांना सामान्यतः नोव्हेंबरमध्ये हयातीचा दाखला सादर करावा लागतो. ८० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या पेन्शनधारकांना १ ऑक्टोबरपासून दाखला सादर करण्याची सुविधा असते. ईपीएस पेन्शनधारकांसाठी मात्र मागील दाखल्यापासून १२ महिन्यांचे चक्र लागू असते. निर्धारित मुदतीत दाखला सादर न केल्यास पेन्शनचे वितरण तात्पुरते थांबू शकते.
त्यामुळे प्रत्येक निवृत्तिवेतनधारकाने आपली पेन्शन कोणत्या योजनेतून मिळते, संबंधित संस्थेचे नियम कोणते आहेत आणि हयातीचा दाखला कोणत्या पद्धतीने सादर करता येतो, याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. आधार नसणे आणि हयातीचा दाखला न देणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. योग्य पर्यायी पद्धतीने दाखला सादर केल्यास आधार नसल्यामुळेच पेन्शन बंद होण्याची भीती बाळगण्याचे कारण नाही

## पीएफची वेतनमर्यादा वाढली, विमा संरक्षण कधी वाढणार?

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने (ईपीएफओ) अनिवार्य सदस्यत्वासाठीची मासिक वेतनमर्यादा १५ हजार रुपयांवरून २५ हजार रुपयांपर्यंत वाढविली आहे. १७ सप्टेंबर २०२६ पासून लागू झालेल्या या निर्णयामुळे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ), कर्मचारी पेन्शन योजना (ईपीएस) आणि कर्मचारी ठेव संलग्न विमा योजना (ईडीएलआय) यांच्या लाभांची व्याप्ती वाढण्याची अपेक्षा आहे.
मात्र, वेतनमर्यादेत वाढ होऊनही ईडीएलआय योजनेतील कमाल विमा संरक्षण अद्याप ७ लाख रुपयांवरच कायम आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा आधार वाढला असताना विमा संरक्षणाची मर्यादा का वाढलेली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**■ पीएफ योगदानात किती वाढ?**:
नव्या वेतनमर्यादेमुळे २५ हजार रुपयांपर्यंत मासिक पात्र वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अनिवार्य ईपीएफ सदस्यत्वाच्या कक्षेत समावेश होईल. पूर्वी १५ हजार रुपयांच्या वेतनमर्यादेवर कर्मचाऱ्याचे १२ टक्के योगदान म्हणजे दरमहा १,८०० रुपये जमा होत होते. आता २५ हजार रुपयांच्या मर्यादेनुसार हे योगदान ३ हजार रुपयांपर्यंत जाऊ शकते. त्यामुळे भविष्य निर्वाह निधीतील बचत वाढण्यास मदत होईल. प्रत्यक्ष योगदान संबंधित कर्मचाऱ्याचे पात्र वेतन, सदस्यत्व आणि नियमांवर अवलंबून राहील.

**■ विम्याची गणना १०.५० लाखांपर्यंत**




: ईडीएलआय योजनेत कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर पात्र वारसांना विम्याची रक्कम दिली जाते. या विम्यासाठी कर्मचाऱ्याला स्वतंत्र हप्ता भरावा लागत नाही. नियोक्ता निर्धारित वेतनाच्या ०.५ टक्के योगदान देतो. पूर्वी १५ हजार रुपयांच्या वेतनमर्यादेनुसार नियोक्त्याचे मासिक योगदान ७५ रुपये होते. नव्या २५ हजार रुपयांच्या मर्यादेनुसार ते १२५ रुपये होते.
ईडीएलआय लाभाच्या गणनेत सरासरी मासिक वेतनाच्या ३५ पट रक्कम आणि भविष्य निर्वाह निधीतील सरासरी शिल्लक रकमेच्या ५० टक्के हिस्सा, कमाल १.७५ लाख रुपये, विचारात घेतला जातो. त्यानुसार २५ हजार रुपये सरासरी मासिक वेतन असलेल्या कर्मचाऱ्यासाठी वेतनाच्या ३५ पट रक्कम ८.७५ लाख रुपये होते. त्यामध्ये पीएफ शिल्लकीशी संबंधित कमाल १.७५ लाख रुपयांची भर घातल्यास गणनेनुसार विमा लाभ १०.५० लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकतो.

**■ तरीही ७ लाखांचीच मर्यादा का?**: ईडीएलआय ही ईपीएफओच्या अंतर्गत स्वतंत्र वैधानिक विमा योजना आहे. सध्याच्या तरतुदींनुसार ही मर्यादा ७ लाख रुपये आहे. त्यामुळे गणनेनुसार विमा रक्कम १०.५० लाख रुपये होत असली, तरी प्रत्यक्ष देय लाभ ७ लाख रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहतो. ही मर्यादा वाढविण्यासाठी सरकारला ईडीएलआय योजनेच्या संबंधित तरतुदींमध्ये स्वतंत्र सुधारणा करून अधिसूचना जारी करावी लागेल. अशी अधिसूचना जारी होईपर्यंत वाढीव विमा संरक्षण लागू झाल्याचे मानता येणार नाही.

**■ स्वतंत्र मुदत विम्याची गरज** : इगृहकर्ज, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा दैनंदिन खर्च आणि इतर आर्थिक जबाबदाऱ्या लक्षात घेतल्यास ७ लाख रुपयांचे संरक्षण अपुरे ठरू शकते. विशेषतः अधिक वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांनी केवळ ईडीएलआय विम्यावर अवलंबून न राहता स्वतंत्र मुदत जीवनविमा घेण्याचा विचार करणे आवश्यक आहे. पीएफची वेतनमर्यादा वाढल्यामुळे निवृत्तीसाठीची बचत वाढू शकते; मात्र त्याच प्रमाणात जीवनविमा संरक्षण आपोआप वाढत नाही.

# भव्यदिव्य जिनेश्वरी भक्ती यात्रेतून नगरमध्ये अवतरले जैन परंपरांचे आध्यात्मिक वैभव

## जिनेश्वरी भक्ती यात्रा सुंदर व नेत्रदीपक : प्रविणऋषीजी महाराज

नगर – तीर्थंकर भगवान महावीर यांचा जयकारा, जिनेश्वरीची भव्य प्रतिकृती, पंचपरमेष्ठीचे पाच सजवलेले घोडे व घोडेस्वारांच्या हातात जैन ध्वज, सजवलेल्या चांदीच्या पालखीत ठेवलेली जिनेश्वरी, नवकार कलशधारी श्राविका, अष्टमंगल, जैन साधू साध्वी, गणधर, इंद्र इंद्रायणी, राजा राणी, लहान मुलांचे बॅण्ड पथक, १६ सतियाजी, पशुपक्षी बनवलेले लहान मुले, व्हिंटेज कार, घोडा बग्गी, वाद्य पथक, अर्हम् विज्ञा साधक, गौतम निधी उपासक, विविध राज्यातील पारंपरिक वेशभूषा परिधान केलेले भाविक तसेच श्रावक, श्राविकांचा अपूर्व उत्साह अशा मंगलमय वातावरणात अहिल्यानगर शहरात रविवारी सकाळी नवचैतन्य अवतरले. स्टेशन रोडवरील सथ्था कॉलनी येथून निघालेल्या जिनेश्वरी भक्ती यात्रेतून जैन परंपराचा जागर करण्यात आला. सथ्था कॉलनी ते आनंदतीर्थ समवशरण या मार्गावर भक्ती यात्रेत हजारो भाविक सहभागी झाले होते.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यभूमीत आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. यांच्या सान्निध्यात समर्पण चातुर्मासात भाविकांना धार्मिक व अध्यात्मिक पर्वणीचा लाभ मिळत आहे. सथ्था कॉलनी येथे जैन ध्वज दाखवून भक्ती यात्रेचा शुभारंभ झाला.




आनंदधाम परिसरातील आनंदतीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. यांच्या सान्निध्यात समर्पण चातुर्मासात भाविकांना धार्मिक व अध्यात्मिक पर्वणीचा लाभ मिळत आहे. सथ्था कॉलनी येथे जैन ध्वज दाखवून भक्ती यात्रेचा शुभारंभ झाला.

याप्रसंगी जिनेश्वरी भक्ती यात्रेचे लाभार्थी राजमल आदेश संभव चंगेडिया, हिरालाल अनिल वसंत पोखरणा, विजय किशोर कुणाल, श्लोक गुगळे, मनसुखलाल संजय पंकज गुंदेचा व सर्व सथ्था कॉलनी परिवार, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, पुणे श्रावक संघाचे अध्यक्ष विलास राठोड, पद्मश्री पोपटराव पवार, जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, श्रीरामकृष्ण पतसंस्थेचे श्रीगोपाल धूत, गुरू आनंद फौंडेशनचे सुनील नहार, विजयकांत कोठारी, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा, भक्ती यात्रेचे लाभार्थी , समर्पण चातुर्मास कमिटीचे कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष राजकुमार बोरा, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, आशिष गांधी, सथ्था कॉलनी येथील अण्णा मुनोत, राजेंद्र चोपडा, अमित पोखरणा, नयन पोखरणा, सुरेश भंडारी, शरद मुनोत, नरेंद्र लोहाडे, किशोर गांधी, गिरीश अग्रवाल, नरेश मुनोत, सचिन मुनोत, कमलेश मुनोत, प्रियांका चंगेडिया, पूजा पोखरणा, अमृता गुगळे, मनोज गुगळे, संदीप गुगळे, वसंत पोखरणा, संगिता गुंदेचा, सौरभ बोरा मित्र मंडळाचे सदस्य तसेच नगरसह देशभरातून आलेले भाविक उपस्थित होते.

तिर्थेशऋषीजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाखाली लाभार्थी परिवार आणि सथ्था कॉलनी परिवारांनी भक्ती यात्रेचे सुंदर नियोजन केले. सकाळी ७ वाजता अतिशय प्रसन्न वातावरणात निघालेल्या या जिनेश्वरी ग्रंथ भक्ती यात्रेत अग्रभागी पंचपरमेष्ठीचे पाच अश्व, वाद्य पथक, १० घोडा बग्गी, आठ अष्टमंगल, ५४ नवकार कलशधारी महिला, भगवान महावीर स्वामींचे ११ गणधर, १५० साधू, ३६० साध्वीजींची वेशभूषा केलेले भाविक, १६ जैन सतियाजी, ६४ इंद्र-इंद्रायणी देवतांच्या वेशभूषा परिधान केलेले भाविक, राजस्थानी, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, गुजरात, साऊथ इंडियातील पारंपरिक वेशभूषा केलेले भाविक, अर्हम् विज्ञाचे १०८ साधक, १८ देशांचे राजा राणी, सजवलेल्या खुल्या व्हॅनमध्ये आठ फुटी जिनेश्वरी प्रतिकृती, तीर्थंकरांच्या समवशरणमध्ये असलेल्या विविध जीवांच्या वेशभूषा केलेले मुलं, व्हिंटेज कार भक्ती यात्रेत होत्या. नगरकरांनी दुतर्फा मोठी गर्दी करून भक्ती यात्रेचे स्वागत केले. तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जैन परंपरांचे अद्भुत, नयन मनोहारी आध्यात्मिक वैभव सर्वांना अनुभवता आले. यात्रेचा समारोप आनंद तीर्थ समवशरण येथे झाला. चांदीच्या सुशोभित पालखीतून आणलेला पवित्र जिनेश्वरी ग्रंथ समवशरणमध्ये विराजमान करण्यात आला. कार्यक्रमात नगरचा पुत्र आणि आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान किशोर गांधी याचा तसेच पद्मश्री पोपटराव पवार, विलास राठोड, सुनील नहार, विजयकांत कोठारी तसेच भक्ती यात्रा लाभार्थी परिवारांचा चातुर्मास कमिटीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, जिन शासन हे अनुशासनाचे शासन आहे. २० ऑक्टोबर पासून तीर्थंकरांच्या निर्वाण कल्याणक आराधना सुरू होत आहे. आजच्या जिनेश्वरी भक्ती यात्रेत सहभागी झालेले सर्व जण भाग्यशाली आहेत. यात्रेचे लाभार्थी परिवार सौभाग्यशाली आहे. सर्व लाभार्थी परिवारांनी अतिशय सुंदर पद्धतीने भक्ती यात्रा काढून जिनशासनाचा गौरव वाढवला आहे. तीर्थंकर भगवान महावीर यांच्या विचारांचा जयकारा सर्वांनी अनुभवला. अहिल्यानगरची ही जिनेश्वरी भक्ती यात्रा अपेक्षेप्रमाणे अभूतपूर्व झाली, याचा खूप आनंद वाटतो. जिनेश्वरी भक्ती यात्रा रोड शो यासाठीच केली की जगाला तीर्थंकर भगवान महावीरांचे आध्यात्मिक वैभव कळावे.

पोपटराव पवार म्हणाले, तीर्थंकर भगवान महावीर यांनी २५७२ वर्षांपूर्वी निसर्गाबरोबर कसे चालले पाहिजे ही शिकवण दिली आहे. त्यांनी दिलेल्या विचारांची आज जगाला गरज आहे. मी ग्राम विकासाचे जे कार्य केले त्यामागे महावीरांच्या विचारांची प्रेरणा आहे. भारत हा एकमेव देश आहे, जिथे वसुधैव कुटुंबकम् हा महान मंत्र दिला जातो. आज जगभरात पाण्याची समस्या अतिशय गंभीर बनली आहे. निसर्गाशी खेळ केल्याने आज निसर्ग आपल्यावर कोपला आहे. भारतीय परंपराच सगळ्या जीवांना जगण्याचा समान अधिकार देणारी आहे. आचार्यश्रींची जन्मभूमी शिराळ चिचोंडी मोठे तीर्थस्थळ आहे. गुरूदेवांच्या मार्गदर्शनात हे गाव सर्वार्थाने आदर्श गाव करण्यासाठी निश्चितच योगदान देईल.

अशोक (बाबूशेठ) बोरा म्हणाले, आजची जिनेश्वरी भक्ती यात्रा नगरसाठी मोठी भेट आहे. सर्व लाभार्थी परिवारांनी उत्कृष्ट नियोजन करत योगदान देत जिन शासनाची शान वाढवली. पोपटराव पवार यांनी चिचोंडी शिराळ येथील विकासासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली यासाठी सगळे त्यांचे आभारी आहोत. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी सौरभ, राखी, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा परिवाराने चातुर्मास काळात सर्वांसाठी गौतम प्रसादी तसेच मंडप व्यवस्था केली आहे. तपस्वींना सोने तसेच चांदीच्या नाण्यांची भेटही बोरा परिवार देत आहे. सौरभ बोरा मित्र परिवाराचे सदस्य सर्व व्यवस्थेसाठी खूप परिश्रम घेत आहे. त्यांचेही विशेष आभार मानतो. २० ऑक्टोबर पासून दररोज सकाळी ७.३० वाजता श्रीमद् उत्तराध्ययन श्रुतदेव आराधना सुरू होत आहे. याचा भाविकांनी लाभ घ्यावा.

सूत्रसंचालन प्रा.प्रसाद बेडेकर यांनी केले. प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांच्या मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली. भक्ती यात्रेत सहभागी झालेल्या सर्व भाविकांसाठी लाभार्थी परिवारांनी सकाळी सथ्था कॉलनी येथे नवकारशीची व्यवस्था केली होती.



नवरात्र उत्सवानिमित्त गोरेगाव (पारनेर) येथील मळगंगा देवी मंदिरात घटस्थापना झाली. ८ व्या माळेला चांगले धान उगवले. भाविकांनी अष्टमीला होमाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. (छायाचित्र : विजय मते)

# भोंडला हा स्त्री शक्तीचा आणि एकोप्याचा उत्सव

## नगरसेविका शितल ढोणे यांचे प्रतिपादन; सीताराम सारडा विद्यालयात रंगला भोंडला उत्सवाचा रंग

नगर – हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पारंपरिक भोंडला कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. भोंडला हा महाराष्ट्राच्या परंपरेचा आणि स्त्री शक्तीचा सुंदर उत्सव आहे. भोंडला या खेळामुळे एकोपा निर्माण होतो आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख होते, असे प्रतिपादन नगरसेविका शितल ढोणे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात संतोष गेनाप्पा व नगरसेविका सुनिता गेनाप्पा यांच्या हस्ते शारदा देवीचे विधिवत पूजन करून करण्यात आली. यावेळी पौराहित्य मनोज कोंडजकर यांनी केले. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे कार्यकारी सदस्य डॉ. पारस कोठारी, सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, प्राथमिक शाळेच्या चेअरमन प्रा. ज्योती कुलकर्णी, मुख्याध्यापिका मंगला डोळस, पर्यवेक्षिका नंदा कानिटकर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, शिक्षक प्रतिनिधी विनोद जोशी, निमा राहिंज, शिक्षकेतर प्रतिनिधी



हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पारंपरिक भोंडला कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

गोवर्धन पांडुळे, गणेश नागपुरे,दीपक आरडे, अमोल कदम, दीपक शिरसाठ, प्रवीण लोखंडे, अनंत जोशी, रवींद्र चोभे, अजय पुंड, भारत औटी, क्रांती मुंदाणकर, शितल शिंदे, वृषाली जोशी, दिपाली लगड आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. कुलकर्णी म्हणाल्या, नवरात्र उत्सवानिमित्त सर्वत्र चैतन्याचे वातावरण आहे. भोंडला कार्यक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. सकारात्मक विचार ठेवून आणि आशावादी राहून विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीचे व भारताचे नाव उज्ज्वल करावे. बोरा म्हणाले, कार्यक्रमाला लाभलेले मान्यवर संतोष गेनाप्पा, नगरसेविका सुनिता गेनाप्पा व शितलताई ढोणे यांनी नगरच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. भोंडला कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले. भोंडला नृत्य व गरबा नृत्याने सर्वांना भारावून टाकले. सूत्रसंचालन सुजाता खामकर यांनी तर, स्वागत दीपक आरडे यांनी केले. आभार दीपक शिरसाठ यांनी मानले.

# रिदम अ‍ॅण्ड एक्स्टसीमध्ये आई-मुलांच्या गरब्याने फुलले आनंदाचे रंग

## द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये चिमुकल्यांसह मातांचा उत्स्फूर्त सहभाग

नगर – नवरात्रोत्सवाच्या उत्साहात रंग ताल आणि आनंदाची उधळण करत द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये आयोजित रिदम अ‍ॅण्ड एक्स्टसी या आगळ्यावेगळ्या आई व मुलांच्या गरबा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात मदर-टॉडलरपासून सीनियर केजीपर्यंतच्या चिमुकल्यांनी आपल्या आईसोबत गरब्याच्या तालावर ठेका धरत उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमातून आई-मुलांमधील भावबंध अधिक दृढ होण्याबरोबरच मुलांच्या आत्मविश्वासाला व्यासपीठ मिळाले. संस्थेच्या संचालिका व प्राचार्या उमंग नंदा यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



द ग्रीन व्हॅली प्रीस्कूलमध्ये आयोजित रिदम अ‍ॅण्ड एक्स्टसी या आगळ्यावेगळ्या आई व मुलांच्या गरबा स्पर्धेला प्रतिसाद मिळाला. (छायाचित्र – समीर मन्यार)

पारंपरिक गरब्याच्या तालावर आई आणि मुलांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्काराने कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य, नृत्यातील सहजता, तालबद्धता आणि आई-मुलांमधील समन्वय यामुळे उपस्थितांना आनंदाची अनुभूती मिळाली. आईच्या साथीने चिमुकल्यांचा आत्मविश्वास वाढला. आईचा हात हातात घेऊन मंचावर नृत्य करताना चिमुकल्यां-मध्ये दिसणारा उत्साह आणि आत्मविश्वास वाढला मुलांबरोबर पाल्यांनाही आपले कलागुण सादर करण्याची संधी मिळाली, असे प्राचार्य उमंग नंदा यांनी सांगितले.

कार्यक्रमात सहभागी माता आणि मुलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिस देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वर्षा कुळथे, वैशाली सोंटक्के, शीतल जाधव, कु. विद्या, कु. समृद्धी, कु. धनश्री आणि सौ. सुनीता लेयचिट्टी यांनी विशेष परिश्रम घेतले. रिदम अ‍ॅण्ड एक्स्टसी हा उपक्रम केवळ नृत्यस्पर्धेपुरता मर्यादित न राहता आई- मुलांच्या नात्यातील जिव्हाळा वाढवणारा, मुलांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा आणि आनंदातून शिकण्याची संधी देणारा अविस्मरणीय अनुभव ठरला.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात कथाकथन उपक्रम उत्साहात

नगर – येथील रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने कथाकथन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शुभांगी दांगट यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी, कथाकथन हे जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे माध्यम असून विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेला आणि अभिव्यक्तीला खुले व्यासपीठ निर्माण करून देणारा उपक्रम आहे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी अनेक ऐतिहासिक, सामाजिक, बोधपर कथा सांगीतल्या. प्रमुख पाहुणे डॉ. गणेश विधाटे यांनी ऐतिहासिक कथाकथन करून विद्यार्थिनींना मंत्रमुग्ध केले. कथाकथनाच्या माध्यमातून इतिहास, संस्कृती आणि जीवनमूल्ये विद्यार्थिनींपर्यंत प्रभावीपणे पोहोचतात, असे सांगत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख डॉ. भूपेंद्र निकाळजे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात सहभागी विद्यार्थिनींच्या कलागुणांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमास मराठी विभागप्रमुख डॉ. सचिन कोतकर, डॉ. फातेमा अंबेकर, प्रा. गितांजली खाडे, प्रा. प्रेरणा काळे, प्रा. नेहा सय्यद, प्रा. शुभांगी शिंदे आणि प्रा.वर्षा वाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमास महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने कथाकथन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आभार दीक्षा गायकवाड यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रिती चक्रनारायण हिने केले. विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कथाकथन उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# ‘माजदा आर्ट फाउंडेशन’ राष्ट्रीय कला स्पर्धेमध्ये नगरच्या नुरील भोसले यांच्या चित्रास द्वितीय क्रमांक

## राष्ट्रीय पातळीवर पुरस्काराने गौरव; २२३० इंच आकाराच्या कागदावर पेनाच्या साह्याने रेखाटलेली कलाकृती

नगर – कला क्षेत्राच्या विकासासाठी हैदराबाद येथील ‘माजदा आर्ट फाउंडेशन’तर्फे दरवर्षी राष्ट्रीय पातळीवर कला स्पर्धा व प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत ५ लाख रुपयांची पारितोषिके देऊन भारतातील नवोदित तसेच प्रस्थापित कलाकारांना प्रोत्साहन दिले जाते. यावर्षी ११ ते १३ सप्टेंबर दरम्यान ‘स्टेट गॅलरी ऑफ आर्ट’, माधापूर, हैदराबाद येथे हे प्रदर्शन पार पडले. या राष्ट्रीय स्पर्धेत रोशन साहू यांना प्रथम तर अहिल्यानगर (महाराष्ट्र) येथील चित्रकार तथा प्राध्यापक नुरील भोसले यांच्या ‘आफ्टर ग्रेझिंग’ या चित्रास द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.




या स्पर्धा-प्रदर्शनात देशभरातील सुमारे २०० कलाकारांच्या २५० हून अधिक उत्कृष्ट कलाकृती मांडण्यात आल्या होत्या. पुरस्कार वितरण सोहळा ‘पोल्मॉन ग्रुप’च्या संचालिका तथा कला मर्मज्ञ उशाराणी मन्ने यांच्या हस्ते झाला. या स्पर्धेसाठी अजित्या हजरा, माधवन गोयल, सदाशिव सावंत, निशिकांत पाळंदे आणि बोल्गुम नागेश गौड या भारतातील ख्यातनाम कलाकारांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. नुरील भोसले यांचे ‘आफ्टर ग्रेझिंग’ (चरून झाल्यानंतर) हे चित्र कृष्णधवल (Monochrome) स्वरूपात ‘स्टीपलिंग’ (Stippling – बिंदू तंत्र) या अत्यंत कल्पक तंत्रात रेखाटलेले वास्तववादी चित्र आहे. २२३० इंच आकाराच्या कागदावर पेनाच्या साह्याने रेखाटलेली ही कलाकृती आहे.

चित्रात एक गाय झाडाखाली जमिनीवर शांतपणे बसून रवंथ करताना व विश्रांती घेताना दिसते. चित्राच्या खालील बाजूस गाईचे सूक्ष्म व तपशीलवार रेखाटन केले असून, वरच्या कोपऱ्यात बाभळीच्या झाडाची छोटी फांदी व पाने दाखवून चित्राची रचना सुरेख संतुलित केली आहे. पार्श्वभूमीत सोडलेली मोकळी जागा प्रखर उन्हाची तीव्रता दर्शवते आणि मुख्य विषयाकडे लक्ष वेधून घेते.

गाईच्या शरीरावर पडणारा सूर्यप्रकाश, कातडीवरील सुरकुत्या, अंगावरील केस, स्नायूंची रचना, हाडांची बाह्यरेषा आणि सुकलेले गवत दर्शवण्यासाठी पेनाच्या असंख्य बिंदूंचा (Stepling) अत्यंत कौशल्याने वापर करण्यात आला आहे.



दिव्य दृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगरमध्ये जागतिक पांढरी काठी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# अहिल्यानगरमध्ये जागतिक पांढरी काठी दिन उत्साहात साजरा

## दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, पांढरी डिजीटल काठी, सॅक आणि स्मार्ट किटचे वितरण

नगर – प्रत्येक पावलात सन्मान, प्रत्येक संधीमध्ये समानता आणि प्रत्येक स्वप्नाला भरारी घेण्याची संधी! या प्रेरणादायी विचाराला केंद्रस्थानी ठेवून अहिल्यानगर येथे जागतिक पांढरी काठी दिन २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दृष्टिबाधित व्यक्तींच्या स्वावलंबनाला प्रोत्साहन देणे, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करून देणे आणि समाजामध्ये समानता व समावेशकतेची भावना दृढ करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

दिव्य दृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी, तज्ज्ञ आणि दिव्यांग बांधव सहभागी झाले. कार्यक्रमाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे, तर समान संधी, योग्य मार्गदर्शन आणि स्वाभिमानाने जगण्यासाठी आवश्यक पाठबळ देण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी धनश्री विखे, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, ब्रिगेडियर राजीव चावला, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, उपअधीक्षक शिरीष वमने, बँक ऑफ बडोदाचे मनीष कुमार, हरजीतसिंग वधवा, दिव्य दृष्टी संस्थेचे कृष्णा तवले, मुख्य कार्यकारी अधिकारी सुमन कुरेल आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनकडून ५० विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे वितरण या कार्यक्रमात केले गेले. त्याचप्रमाणे शोभा सर्वोदय फाउंडेशन कडून एकूण २५० जणांना पांढरी डिजीटल काठीचे वाटप करण्यात आले. बँक ऑफ बडोदा कडून १०० जणांना सॅकचे वाटप करण्यात आले. डॉ.सुजय विखे फाउंडेशन आणि डीआरडीसी मार्फत स्मार्ट किटचे वितरण करण्यात आले. तसेच दिव्यांगासाठी इ सायकलचे वितरण करण्यात आले. तिरुपती गायकवाड यांनी दिव्यांगांसाठी उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगाविषयी माहिती दिली. बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रादेशिक व्यवस्थापक रवी रंजन प्रशून यांनी आर्थिक समावेशन व बँकिंग सुविधांबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

जुन्नर येथील सेंटर फॉर डिसॅबिलिटी आर्ट्स डेव्हलपमेंटचे संस्थापक विकास बाजीराव घोगरे, अनामप्रेमच्या अनिता माने, दृष्टिबाधितांसाठी शिक्षक म्हणून कार्य करणारे सुनील परभणे आणि आकांक्षा रिहॅबिलिटेशन सेंटरच्या संचालिका सविता काळे यांना त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले.



तुळजापूर येथून निघालेल्या पालखीचे गजराजनगर येथे स्वागत करण्यात आले. या पालखीची मिरवणूक काढून सुवासिनींच्या हस्ते महाआरती करण्यात आली. भाविक उपस्थित होते. (छायाचित्र – विजय मते)

## गजराजनगरला वैष्णोदेवी मंदिरात तुळजाभवानी पालखीची आरती

नगर – नगर – छत्रपती संभाजीनगर रोडवरील गजराजनगर येथील वैष्णोदेवी मंदिरात नवरात्र उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सोमवारी दुपारी १२ वाजता तुळजापूर येथून निघालेल्या पालखीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

गजराजनगर येथे महिलांनी संपूर्ण रस्त्यावर सडा, रांगोळी टाकून या पालखीचे स्वागत केले. वैष्णोदेवी मंदिरात पालखीचे सुवासिनींचे हस्ते पूजन करून त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी भाविक उपस्थित होते. महिलांना उपवासाचे फराळाचे वाटप करण्यात आले. गजराजनगर येथील तरुण कार्यकर्त्यांनी पालखी खांद्यावर घेत परिसरातून मिरवणूक काढली. यावेळी जय भवानी जय शिवाजी, आई राजा उदो उदो अशा घोषणा देण्यात आल्या.

## भिंगारच्या तुळजामाता मंदिर परिसरात वृक्षारोपण अन् स्वच्छता अभियान

### नवरात्रोत्सवात हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भाविकांना खिचडी व फळांचे वाटप




हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भिंगार येथील विजयलाइन चौकातील अंबिका तरुण मंडळाच्या तुळजामाता मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

नगर – सामाजिक, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भिंगार येथील विजयलाइन चौकातील अंबिका तरुण मंडळाच्या तुळजामाता मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीतून नागरिकांना दिलासा मिळावा आणि सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, यासाठी तुळजामाता चरणी प्रार्थनाही करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. रतन मेहेत्रे, ताराचंद ठोकळ आणि अशोक पराते यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करताना भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात, अजय गव्हाणे, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, सरदारसिंग परदेशी, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, प्रांजली सपकाळ, जोगिंदरसिंग, ईशान शेख, जैद सय्यद, प्रशांत चोपडा अश्विनी गोरखे, लताताई गुरव, माधवी माळगे, संगीता सपकाळ, अनिता शेलार, कीर्ती ठाकूर, महिमा माळगे, अंजना भुजबळ, सुनिता गडाख, दिलीप ठोकळ, रमेश वराडे, ईवान सपकाळ, विलास आहेर, मंदिराचे पुजारी सुनील देवा गुरव, नंदू भंडारे, राहुल पानसरे, सोनू भुजबळ, संजय येलुलकर, सरोवर खान, अश्विन ठाकूर आदींसह भाविक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सखाराम अळकुटे, अशोक लोंढे, ज्ञानेश्वर अनावडे, सुधीर कपाळे, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, अविनाश जाधव, शेषराव पालवे, सुभाष पेंढुरकर, दीपक मेहतानी, अभिजीत सपकाळ, रामनाथ गर्जे, उमाशंकर पंडित, अविनाश पोतदार, शिरीषराव पोटे, अनिल सोळसे, संतोष हजारे, दीपक घोडके, शशिकांत पवार, कुमार धतुरे, दिलीप गुगळे, दत्तात्रय लाहुंडे, राजेश तनपुरे, विठ्ठल राहिंज आणि दशरथ मुंडे यांनी परिश्रम घेतले.



पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थिनी, महिला आणि शिक्षिकांनी दांडियाच्या तालावर ठेका धरत उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या मैदानावर हा कार्यक्रम रंगला होता.

## भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये दांडियाचा जल्लोष; विद्यार्थिनींसह शिक्षिकाही थिरकल्या!

नगर – दिवसभर अर्थार्जनाची धावपळ, कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे आणि रात्री शिक्षण घेऊन स्वतःच्या भविष्याला आकार देण्याची जिद्द... अशा संघर्षमय दिनचर्येतून वेळ काढत ज्ञानार्जन करणाऱ्या महिला व युवतींनी नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित दांडिया आणि रास–गरबाच्या कार्यक्रमात सहभाग नोंदविला. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थिनी, महिला आणि शिक्षिकांनी दांडियाच्या तालावर ठेका धरत उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या मैदानावर हा कार्यक्रम रंगला होता.



रात्रशाळेतील विद्यार्थी–विद्यार्थिनींना विविध सण–उत्सवांचा आनंद घेता यावा, त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा आणि शिक्षणाच्या प्रवासात आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, या उद्देशाने नवरात्रोत्सवानिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रात्रशाळेत एकूण ५८९ विद्यार्थी प्रवेशित असून, त्यापैकी २७७ महिला व मुली आहेत. दिवसभर विविध जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थिनींनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हिंदसेवा मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. अनंत फडणीस, रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी आणि रात्रशाळेच्या माजी चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य माहेश्वरी गावित उपस्थित होते. यावेळी शहरातील दिवसाच्या शाळांमध्ये कार्यरत असलेल्या महिला प्राचार्या, मुख्याध्यापिका आणि शिक्षिकांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. त्यामध्ये महर्षी ग. ज. चीतांबर विद्या मंदिरच्या प्राचार्य मंदा शिंदे, पर्यवेक्षिका कल्पना काळोखे, सौ. काळे मॅडम, माजी मुख्याध्यापिका निर्मला भंडारी, मेहेर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुरीता झगडे, बीएड कॉलेजचे माजी प्राचार्य रवींद्र चोभे, भाजपचे माजी नगरसेवक सचिन पारखी, सरस्वती नाईट हायस्कूलच्या विना कुऱ्हाडे आणि धारूरकर मॅडम यांच्यासह दिवसाच्या शाळांमधील अनेक महिला मुख्याध्यापिका व शिक्षक उपस्थित होते. शहरातील अनेक महिला मुख्याध्यापिका यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

रात्रशाळेचे प्राचार्य सुनील सुसरे यांनी स्वागत केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी सर्व पाहुण्यांना तुळशीचे रोप भेट देण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थी, शिक्षक आणि पालक उपस्थित होते.

दिवसभर कष्ट करून रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधी या उपक्रमातून देण्यात आली याबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष अनंत देसाई, मानद सचिव सुमतीलाल कोठारी व माजी मानद सचिव संजय जोशी यांनी कौतुक करून आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी व शिक्षिका वृषाली साताळकर, स्वाती होले आणि अनुराधा दरेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्री तुळजाभवानी मंदिरात २० ऑक्टोबरला रावण दहन सोहळा

नगर – श्री तुळजाभवानी मंदिर ट्रस्टच्या वतीने २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता पाइपलाइन रोड, सावेडी येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात रावण दहन सोहळा, हिंदू धर्मसभा आणि शिव शंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार २०२६ प्रदान समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विचार भारती संस्थेचे संस्थापक मार्गदर्शक राजाभाऊ मुळे यांना यंदाचा शिव शंभू हिंदू धर्मरक्षक पुरस्कार २०२६ प्रदान करून त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी श्री शंकर महाराज मठाचे अशोक (दादा) जाधव महाराज राहणार आहेत. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते राजाभाऊ मुळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. समाजप्रबोधन, हिंदू संस्कृतीचे संवर्धन आणि विविध सामाजिक उपक्रमांमधील योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.



### केडगाव येथे मोरया युवा प्रतिष्ठानतर्फे नवरात्रोत्सवानिमित्त महाप्रसादाचे आयोजन

श्री रेणुकामाता देवस्थान, केडगाव येथे नवरात्र उत्सवाच्या प्रसंगी 'मोरया युवा प्रतिष्ठान'च्या वतीने महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला परिसरातील भाविक भक्तांचा आणि नागरिकांचा प्रतिसाद लाभला. या सोहळ्यामध्ये बालगोपालांच्या मनोरंजनासाठी विशेषरुपाने 'गोरिला'चा देखावा हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ईश्वर पवार, उपाध्यक्ष स्वामी टाकळकर, शुभम टाकळकर, धीरज पोखरणा, हिमांशू साखला, सागर शर्मा, अमित सोनग्रा, अतुल रासकर, विक्रम नारंग, विवेक माणिकजडे, आयुष रासकर यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



जय तुळजाभवानी उत्सव मंडळ आयोजित फॅन्सी ड्रेस व डान्स स्पर्धेला प्रतिसाद मिळाला. (छायाचित्र – उदय जोशी)

## चिमुकल्यांच्या फॅन्सी ड्रेस अन् डान्स स्पर्धेला प्रतिसाद

नगर – सिव्हिल हाडको येथील श्रीराम चौकात जय तुळजाभवानी उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित फॅन्सी ड्रेस व डान्स स्पर्धेला चिमुकल्यांचा प्रतिसाद मिळाला. फॅन्सी ड्रेस स्पर्धेत चिमुकल्यांनी पुष्पा चित्रपटातील पुष्पाराज अर्थात 'झुकेगा नहीं साला', सैनिक, भाजीवाली, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, शेतकरी, वारकरी, महाकाली आणि क्वीन अशा विविध व्यक्तिरेखा साकारल्या. पारंपरिक वेशभूषेपासून आधुनिक संकल्पनांपर्यंत विविध विषयांचा समावेश या स्पर्धेत करण्यात आला होता. एका चिमुकलीने भाजीवालीची वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधले. एका स्पर्धकाने चॅटजीपीटीच्या माध्यमातून संदेश देण्याचा प्रयत्न केला. तर टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याचा संदेश देण्यासाठी एका बालस्पर्धकाने संपूर्ण कागदापासून तयार केलेला ड्रेस परिधान केला होता. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पावसाचे महत्त्व सांगणारे सादरीकरणही लक्षवेधी ठरले. 'पावसाने राजीनामा दिला तर काय होईल?' या कल्पनेतून पावसाची वेशभूषा साकारत पाऊस न पडल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे चित्रण करण्यात आले. या सादरीकरणातून पाण्याचे महत्त्व आणि निसर्गावरील मानवी जीवनाचे अवलंबित्व अधोरेखित झाले.

डान्स स्पर्धेत 'लाल लाल कलरची बांगडी', 'शरारत', 'कच्ची कली' आणि 'काठीने घोंगडं' यांसह विविध गाण्यांवर मुलांनी नृत्य सादर केले. हिंदी आणि मराठी गाण्यांच्या तालावर चिमुकल्यांनी आपल्या नृत्यकौशल्याची झलक दाखवली.

## तुळजाभवानी मंदिरात बालकलाकारांकडून महाराष्ट्राच्या लोककलेचा जागर

### ६० बालकलाकारांच्या नृत्याविष्काराने भाविक मंत्रमुग्ध; देवीच्या विविध रूपांचे भावपूर्ण सादरीकरण



शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात नृत्य दर्पण अ‍ॅकॅडमीच्या वतीने महाराष्ट्राच्या लोककलेचा जागर करण्यात आला. अ‍ॅकॅडमीच्या ६० बालकलाकारांनी विविध नृत्यप्रकारांतून देवीच्या विविध रूपांचे सादरीकरण करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. (छायाचित्र – लहु दळवी)

नगर – शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी माता मंदिरात नृत्य दर्पण अॅ कॅडमीच्या वतीने महाराष्ट्राच्या लोककलेचा जागर करण्यात आला. अ‍ॅकॅडमीच्या ६० बालकलाकारांनी विविध नृत्यप्रकारांतून देवीच्या विविध रूपांचे सादरीकरण करत उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. भक्ती, नृत्य आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात गणेशाच्या आरतीने करण्यात आली. त्यानंतर नटराज पूजन, महालक्ष्मीची आरती, नवदुर्गांची विविध रूपे आणि चामुंडेश्वरी देवीचा जयजयकार अशा भक्तिमय सादरीकरणांनी कार्यक्रमाला सुरुवात झाली. देवीचा गोंधळ, जागरण–गोंधळ, महाराष्ट्राची लोकगीते, विविध देवींच्या महाआरत्या आणि तुळजाभवानी मातेचा गोंधळ या सादरीकरणांनी वातावरण भक्तिमय झाले. नृत्य दर्पण अ‍ॅकॅडमीच्या बालकलाकारांनी आपल्या नृत्यकौशल्यातून देवीच्या विविध रूपांचे दर्शन घडविले. पारंपरिक लोककला आणि धार्मिक विधींचे नृत्यरूप सादरीकरण करत त्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाची ओळख करून दिली. भरतनाट्यमच्या सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. बालकलाकारांच्या नृत्याविष्काराला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राची सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला. देवीच्या जयघोषाने आणि मंगलमय वातावरणाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. नवरात्रोत्सवातील या विशेष कार्यक्रमामुळे भाविकांना भक्तिरसाबरोबरच महाराष्ट्राच्या लोककलेचा आनंद घेता आला. नवरात्रोत्सव हा शक्तीची उपासना करण्याबरोबरच भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करण्याचा उत्सव आहे. नृत्य दर्पण अ‍ॅकॅडमीच्या बालकलाकारांनी सादर केलेल्या कार्यक्रमातून देवीची आराधना, लोकपरंपरा आणि नृत्यकलेचा सुरेख मेळ साधण्यात आला. बालवयातच मुलांना लोककला आणि धार्मिक–सांस्कृतिक परंपरांची ओळख व्हावी, या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. यावेळी नृत्य दर्पण अ‍ॅकॅडमीच्या संचालिका अपर्णा थत्ते, अश्विनी भावे, सुजाता कुलकर्णी, सुजाता रेपे, देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे, ओमप्रकाश तिवारी, नवनाथ आंधळे, स्मिता शितोळे, दत्तात्रय तांबे, गोपाळराव सजनुले यांच्यासह भाविक भक्त उपस्थित होते.

# जय माता दी च्या जयघोषाने गुलमोहर रोड दुमदुमला

### मोरया युवा प्रतिष्ठानचा माता की चौकी सोहळा भक्तिमय वातावरणात, हनुमानजींच्या प्रतिकृतीने वेधले भाविकांचे लक्ष



नवरात्रोत्सवानिमित्त सावेडी येथील गुलमोहर रोडवरील मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माता की चौकी हा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

नगर – नवरात्रोत्सवानिमित्त सावेडी येथील गुलमोहर रोडवरील मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माता की चौकी हा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. देवीच्या सुमधुर भक्तिगीतांनी मंत्रमुग्ध झालेल्या भाविकांनी जय माता दी च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला. देवीच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या भक्तिगीतांसह धार्मिक गीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात भक्तीचा रंग भरला. जय श्रीराम या गीताच्या सादरीकरणावेळी अवतरलेल्या हनुमानजींच्या प्रतिकृतीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

जय वैष्णो माता जागरण मंडळाच्या वतीने बल्लू सचदेव यांनी देवीची विविध भक्तिगीते सादर केली. देवीच्या महिम्याचे वर्णन करणाऱ्या आणि तिच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या गीतांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. वाद्यांच्या सुरेल साथीने सादर झालेल्या भक्तिगीतांवर भाविक तल्लीन झाले होते. प्रत्येक गीताला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. ङ्गजय माता दीङ्खच्या गजराने मंदिर परिसरातील वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमात भाविकांनी देवीच्या भक्तिगीतांचा मनमुराद आनंद लुटला. श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक सहभागातून साकारलेल्या या सोहळ्यामुळे नवरात्रोत्सवाचा उत्साह अधिकच वाढला. परिसरातील नागरिक, महिला आणि विविध समाजांतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचा जागर केला.

माता की चौकी कार्यक्रमाला पार्वती (काकी) जगताप, सुवर्णा सचिन जगताप आणि महापौर ज्योतीताई गाडे यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. यावेळी मोरया युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन मदान यांच्यासह परिसरातील नागरिक, शीख व पंजाबी समाजबांधव, राजकीय पदाधिकारी, नगरसेवक, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि महिलांची मोठी उपस्थिती होती. रंगलेल्या भक्तीगीतांवर उपस्थित पाहुण्यांनी भाविकांसह ठेका धरला होता. देवीच्या आरतीनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेल्या पाहुण्यांचे स्वागत सौ. अभिलाषा मदान आणि कु. अर्चना मदान यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विधिवत घटस्थापना करून देवीची आकर्षक मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली आहे. संपूर्ण परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मनोज मदान यांनी उपस्थितांचे आभार मानले.




'नारी शक्ती बुलेट राईड'मध्ये पूर्वा गुपेकर प्रथम आल्याबद्दल नगरसेविका सौ. गौरी अजिंक्य बोरकर यांच्या हस्ते त्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## नगरच्या रस्त्यांवर नारीशक्तीची नवी ओळख; 'नारी शक्ती बुलेट राईड'मध्ये पूर्वा गुपेकर प्रथम

नगर – महिलांचा आत्मविश्वास, जिद्द आणि सामर्थ्य अधोरेखित करणाऱ्या 'नारी शक्ती बुलेट राईड २०२६' या स्पर्धेत सौ. पूर्वा अवधूत गुपेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. पारंपरिक वेशभूषेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवत त्यांनी या स्पर्धेत आपली वेगळी ओळख निर्माण केली. नगरसेविका सौ. गौरी अजिंक्य बोरकर यांच्या हस्ते त्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

अहिल्यानगरच्या रस्त्यांवर आयोजित या बुलेट राईडच्या माध्यमातून महिलांच्या कर्तृत्वाचा आणि आत्मविश्वासाचा अनोखा आविष्कार पाहायला मिळाला. दुचाकी चालविण्याचे कौशल्य, पारंपरिक वेशभूषा आणि उत्स्फूर्त सहभाग यांमुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. आधुनिकतेची कास धरतानाच भारतीय संस्कृती आणि परंपरा जपण्याचा संदेशही या स्पर्धेतून देण्यात आला.

महिला केवळ कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यापुरत्या मर्यादित नसून प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकतात, हे अशा उपक्रमांतून अधोरेखित होते. बुलेट राईडसारख्या उपक्रमात महिलांचा सहभाग वाढणे ही महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे.

# जिल्हा बँकेसाठी पतसंस्था मतदार संघातून वसंत लोढा यांना उमेदवारी द्यावी

## भाजपाच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट



नगर – जिल्हा सहकारी बँकेसाठी पतसंस्था मतदारसंघातून वसंत लोढा यांना उमेदवारी दिली जावी, अशी मागणी जिल्ह्यातील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागपूर येथे भेटून केली. यावेळी भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, सुनील रामदासी, सचिन पारखी व नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा आदी उपस्थित होते.

जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रीया सुरू झाली असून, लोढा यांनी बिगरशेती व पतसंस्था मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची गेली ३ वर्षेपासून तयारी करीत आहेत. संस्थापक व अध्यक्ष म्हणून वसंत लोढा हे पंडित दिनदयाळ पतसंस्थेच्या माध्यमातून ३५ वर्षापासून सहकारात कार्यरत आहे. महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनवर १० वर्षे संचालक पदावर कार्यरत, संस्थापक व अध्यक्ष म्हणून नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन ९ वर्षापासून कार्यरत आहेत. बिगरशेती मतदारसंघात पतसंस्थेचे ६६५ मतदार तसेच मजुर संस्थांचे ५३५ मतदार आहेत.

गेल्या ६ महिन्यांपासून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पतसंस्थांचे मेळावे, प्रशिक्षण कार्यशाळा, घेवून मतदारसंघ पुर्णपणे संपर्कात आणला आहे. यामुळे श्री.लोढा यांचा असलेला दांडगा अनुभव व संस्थापक बांधणी पहाता मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोढा यांना जिल्हा बँकेच्या बिगर शेती मतदार संघातून उमेदवारी मिळवून दिली. त्यामुळे भाजपाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांला संधी मिळेल व ही जागा बहुमताने जिंकुन पक्षाच्या झोळीत नक्की टाकेल, असा विश्वास लोढा यांनी व्यक्त केला आहे.

### २१ ऑक्टोबरला ठरणार रणसंग्राम

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या माघारीसाठी अवघे दोन दिवस उरलेले असताना अद्याप बिनविरोध निवडीबाबत स्पष्ट संकेत मिळत नसल्याने सेवा सोसायटी मतदारसंघातील बहुतांश इच्छुकांनी स्वतंत्र प्रचार सुरू केल्याची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. यावर नुकतेच विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनीही भाष्य करत बिनविरोध हलचालींबाबत मलाही कल्पना नसल्याचे सांगितल्याने बिनविरोध निवडीबाबत अद्याप संभ्रमच आहे. जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी निवडणूक होत असून यातील चार जागा आधीच बिनविरोध झालेल्या असून उर्वरीत १७ जागांसाठी २२४ उमेदवार रिंगणात आहे. अर्ज माघारीची अंतिम मुदत परवा २१ ऑक्टोबरला असून आज दुपारी चारपर्यंत कोणीही अर्ज मागे घेतलेले नव्हते. त्यात उद्या दसऱ्याची सुट्टी असल्याने अर्ज माघारीसाठी परवाचा एकच दिवस शिल्लक राहणार आहे. त्यामुळे माघारीसाठी नेत्यांची चांगलीच दमछाक होणार असल्याचे दिसत आहे. त्यातच बिनविरोध निवडणुकीबाबत अद्याप स्पष्ट संकेत मिळत नसल्याने सेवा सोसायटी मतदारसंघातील उमेदवारांनी तर स्वतंत्र प्रचार सुरू केला आहे.



नगर शहरातील कोठला परिसरात घासगल्ली येथे कत्तलखान्यावर छापाटाकून पकडलेल्या गोमांस व आरोपीसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# नगर व संगमनेरमधील ४ कत्तलखान्यांवर पोलिसांची कारवाई; ४०० किलो गोमांस जप्त

नगर – नगर शहर व संगमनेर शहरातील ४ कत्तलखान्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या विविध पथकांनी छापेमारी करत ४०० किलो गोमांस जप्त केले आहे. तसेच ४० गोवंशीय जनावरांची सुटका केली. १८ ऑक्टोबर रोजी पहाटे ही कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदारांची विविध पथके तयार करून त्यांना कत्तलखान्यांवर कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पथकांनी १८ ऑक्टोबर रोजी पहाटे नगरमधील तोफखाना आणि संगमनेर शहर पोलीस स्टेशन हद्दीत गोवंशीय जनावरांची कत्तल व गोमांस विक्री करणाऱ्या ठिकाणी धाडी टाकून धडक कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी तीन गुन्हे दाखल करत एकूण ११ लाख ४१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये ४०० किलो गोमांस तसेच ४० लहान–मोठे गोवंशीय जिवंत जनावरे व कत्तलीचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

या कारवाईअंतर्गत नगरमधील कोठला परिसरात घासगल्ली येथे छापा टाकत ८१ हजार ९०० रुपये किमतीचे ४०० किलो गोमांस, सत्तूर, सुरा आणि वजनाचा काटा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी मोईन आरीफ कुरेशी (वय २५, रा. पिरशाहखुंट, अहिल्यानगर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय संगमनेर शहर पोलीस स्टेशन हद्दीत ३ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांनी १४ लाख आणि ६ लाख ६० हजार रुपये किमतीची एकूण ४० लहान–मोठे गोवंशीय जनावरे जप्त केली आहेत. या प्रकरणी बुंदी कुरेशी (रा. भारतनगर, संगमनेर), बुड्डी कुरेशी आणि शमशु कुरेशी (दोन्ही रा. मदिनानगर, संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# फटाका विक्री करण्यास अगर वाजवण्यास न्यायालयाची बंदी नाही



श्रीनिवास बोज्ञा

नगर – सार्वजनिक ठिकाणी एक वर्षभर फटाके वाजवू नये असा स्वइच्छेने मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश जी एस कुलकर्णी व न्यायाधीश नीला गोखले यांनी आदेश दिला. या आदेशाने नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली असून न्यायालयाच्या आदेशामध्ये फटाके वाजवू नये, उत्पादित करू नये अगर विक्री करू नये असा कोणताही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे नागरिकांनी दिवाळी सण फटाके वाजवून साजरा करता येईल यात शंका नाही अशी माहिती दि अहमदनगर फटाका व्यापारी असो चे माजी अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा यांनी माहिती दिली.

दिवाळी हा सण हिंदू धर्माचाच नव्हे तर सर्व धर्मियांचा असून ते उत्साहाने फटाके वाजवून साजरा करीत आलेले आहेत त्यामुळे लोकांचे धार्मिक भावना या आदेशामुळे कुठेही दखावले गेलेले नाहीत, त्यामुळे फटाका वाजवण्यासाठी नागरिकांना कोणतीही हरकत घेतलेली नसून फक्त सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवू नये असा आदेश केलेला आहे त्यामुळे नागरिकांना फटाके आपल्या घरासमोर, गल्ली बोळीत, अगर आपल्या अपार्टमेंटच्या पॅसेज मध्ये वाजवू शकता, तसेच व्यापाऱ्यांनी ही या आदेशाची कोणतीही धास्ती घेण्याची गरज नाही, फटाके विक्री करू नये असा कुठेही उल्लेख आदेशामध्ये केलेला नसल्यामुळे फटाका व्यापारी फटाका विक्रीचा व्यवसाय करू शकतात, असे श्री. बोज्ञा यांनी पत्रकाव्दारे सांगितले.

फटाका व्यवसायावर महाराष्ट्रसह संपूर्ण भारतात लाखो कुटुंबे अवलंबून असून ते फटाके विक्रीचा व्यवसाय करून आपली उपजीविका चालवतात त्यामुळे सदर व्यवसायावर बंदी आणणे अशक्य आहे. फटाका व्यवसायामुळे अनेक बेरोजगारांना दिवाळी सणात रोजगार उपलब्ध होते व या व्यवसायामुळेच त्यांची दिवाळी साजरी होते. यासाठी महाराष्ट्रातील सर्व फटाका व्यापाऱ्यांनी फटाके विक्रीचा व्यवसाय उत्तम प्रकारे करावे असे आवाहन श्री. बोज्ञा यांनी केले आहे.



# गुरुवाणी – ८४

## सर्वश्रेष्ठ तीर्थंकर वाणी

जे एका ध्येयाने परिवर्तन घडवतात ते तीर्थंकर अस्तात. तीर्थंकर भगवान महावीर यांनी असे परिवर्तन केले. ज्या लोकांचे ह्रदय आणि डोके कुटील, जटील आहे, त्यांना धर्माच्या मार्गावर आणणे कठीण असते. भगवान पार्श्वनाथ यांच्या काळापर्यंत ज्यांनी परिग्रह त्याग केला तो ब्रम्हचारी झाला अशी व्यवस्था होती. पण तीर्थंकर महावीरांनी ब्रम्हचर्य व्रत वेगळे केले. त्यांनी साधूंसाठी स्त्री आणि साध्वींसाठी पुरूषाचा त्याग निर्माण केला. तीर्थंकरांच्या ब्रम्हचर्य मर्यादेचा अंगिकार केला तर वासना मुक्त होणे शक्य आहे. परमात्म्याच्या ९ मर्यादांचे पालन केले तर वासना रुपी पिशाच्च सुद्धा देव होईल. रात्री भोजनास तीर्थंकरांनी मनाई केली आहे. यामागे दोन कारणे आहेत, एक कारण आहे फिजिक्सचे आणि दुसरे कारण दिले आध्यात्मिक. इंद्रभूती गौतमने भगवान महावीरांना विचारले, दिवस आणि रात्रीत काय फरक आहे? तीर्थंकरांनी उत्तर दिले, पदार्थाची ऊर्जा दिवसा पॉझिटिव्ह व रात्री निगेटिव्ह असते. साखरेचा गोडवा रात्री निगेटिव्ह काम करतो. रात्री भोजन केल्याने निगेटिव्ह विचार निर्माण होतात. सुधर्मा स्वामी म्हणतात, तीर्थंकर महावीरांनी संपूर्ण जगाला आरपार ए टू झेड पाहिले. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा स्वतःला आरपार पाहता येते. जगाच्या भाषेत बोलता आली पाहिजे. जिनेश्वरी भक्ती यात्रा रोड शो यासाठीच केली की जगाला तीर्थंकर भगवान महावीरांचे आध्यात्मिक वैभव कळावे. ज्याची आराधना आपण करणार आहोत ते परम समवशरण आहे. तीर्थंकरांच्या ज्या समवशरणची आपण आराधना करणार आहोत ते ४८ तासांचे होते. त्यात फक्त इंद्रभूती आणि सुधर्मा स्वामी हे दोनच गणधर होते. सुधर्मा स्वामी होण्यासाठी ताकदवर काळीज लागते. स्वतःला झिरो करून असे जगता आले पाहिजे की कोणी तुमच्या डोळ्यात पाहिले तर त्याला भगवान महावीर दिसले पाहिजेत. तीर्थंकरांनी दीक्षा घेतल्यानंतर २९ चातुर्मास निसर्गात केले. ३० वा शेवटचा चातुर्मास राजा हस्तीपाल, पुण्यपाल यांच्या दरबारात केला. राजांनी विचारलं, प्रभू तुम्ही नसाल तेव्हा जग कसे असेल? आणि नंतर दोघा राजांनी दीक्षा घेतली. परमात्म्यांनी चौदाव्या दिवशी दिव्य समवशरण लावले. देवता, देवी, साधू साध्वी, प्रजा सगळेच ऐकायला आले. अमावस्या संपूण सूर्योदय होण्याची वेळ आली असताना तीर्थंकर भगवान महावीर यांची वाणी थांबली. सुधर्मा स्वामींनी पाहिले, प्रभू नाहीत. परमात्म्याच्या अंतिम वाणीत विज्ञान, राजनीती, पारिवारिक गोष्टी अशा जीवनाच्या प्रत्येक गोष्टीचे सूत्र आहे. तीर्थंकर वाणी जगाला महान करणारी आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



# गुरुवाणी – ८५

## जगात 'विरत्थुई' गान व्हावे

आठ कर्मात सर्वात महत्वपूर्ण कर्म आयुष्य कर्म. हे आयुष्य कर्म असेल तर इतर सात कर्मांनाकाम करण्यास क्षेत्र मिळते. तूपासाठी भांडं लागतं. आयुष्य कर्माचा बंध न होणे हेच साधनेचे उद्दिष्ट असते. आयुष्य कर्माचा बंध झाला नाही त्यावर सुधर्मा स्वामी तीर्थंकरांच्या शिखर गाथेत विवेचन करतात. ते म्हणतात, जे स्वतः श्रेष्ठ आहेत आणि दुसऱ्यांना श्रेष्ठ बनवतात. प्रभू रामाने हनुमान, वानरसेनेला श्रेष्ठ बनवले. रावणाने कोणालाच श्रेष्ठ बनवले नाही, त्याने इतरांना कनिष्ठच ठेवले. स्वतः श्रेष्ठ असलेला इतरांनाही जेव्हा श्रेष्ठ बनवतो, ते तीर्थंकर असतात. त्यांनी याची एक व्यवस्थाच निर्माण केली. अशी व्यवस्था तयार केली की ती २१ हजार वर्षांपासून चालू राहिलं. तुम्ही रोड मेकर होणार असाल तर बना पण रोड ब्रेकर बनू नका. दुसऱ्याचे घर उद्धवस्त करू नका. तीर्थंकरांच्या सुंदर व्यवस्थेच्या मार्गावर कोणी चालत असेल तर त्याच्या मार्गात आडकाठी आणू नका. जगप्रसिद्ध वेरुळ लेणी पहायला गेलात तर अनेक शिल्पांची तोडफोड झालेली दिसते. अनेक कलाकारांनी मेहनतीने साकारलेल्या या कलाकृती तोडून तोडणाऱ्याला काय मिळाले असेल? अशा तोडणाऱ्यांची लेश्या कृष्ण लेश्या असते. तीर्थंकर, गणधर, आचार्यांनी मोठी तपस्या करून एक व्यवस्था निर्माण केलीय, ती तोडण्याचे पाप करू नका. जो देव, गुरू धर्माप्रतीची आस्था तोडतो, तो भगवान महावीर यांचा गुन्हेगार असतो. रावण साधू रूपात आला म्हणून सीतेने लक्ष्मण रेषा ओलांडली. परमात्मा सांगतात, साधू वेशभूषेवरुन नाही तर त्याच्या वागण्या बोलण्यावरून ओळखा. सुधर्मा स्वामी ३० वर्षे तीर्थंकरांसोबत राहिले. त्यांची आस्था तितकी वाढत गेली. अशी व्यक्ती जेव्हा तीर्थंकर महावीरांचे गीत गाते तेव्हा ती अनुभूती असते. म्हणूनच विरत्थुई सारखे दुसरे स्तोत्र नाही. मी कायम आशीर्वाद देतो की, तुमचे स्वप्न कधीही पुर्ण न होवो. स्वप्न पूर्णही झाले नाही पाहिजे आणि तुटलेही नाही पाहिजे. मी त्या दिवसाचे स्वप्न पाहतोय, ज्या दिवशी संपूर्ण जग विरत्थुई गाण करेल. किती अलौकिक असेल तो दिवस. जगात ना युद्ध होईल, ना चोरी होईल, ना वाईट काम होईल. मला माहित आहे, हे स्वप्न पूर्ण होणार नाही, पण तुटणारही नाही. कारण एकदा स्वप्न पूर्ण झाले की कार्यच होणार नाही. माझे गुरू ऐश्वर्यशाली आचार्य भगवंत आहेत. त्यामुळे मी स्वप्न सुद्धा ऐश्वर्यशालीच पाहतो. माझे स्वप्न मी कधीच सोडणार नाही.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**


## जाहीर नोटीस (Public Notice)

वादी आनंद मुरलीधर रोकडे यांच्यामार्फत या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे सावेडी तालुका नगर जिल्हा अहिल्यानगर येथील जमीन गट क्रमांक ३८ ही वादग्रस्त जमीन असून सदर जमिनीचा वाद सध्या न्यायप्रविष्ठ आहे. सदर जमिनीबाबत ८ वे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अहमदनगर येथे सन २००२ पासून दिवाणी दावा क्र. रे.मु.नं. ५४/२००२ हा प्रलंबित (Pending) आहे. सदर दाव्यात आनंद मुरलीधर रोकडे वादी (Plaintiff) आहे.

सदर वादग्रस्त जमिनीचा वाटपाचा दावा न्यायालयात अंतिम निर्णय होणे अद्याप बाकी आहे. असे असतानाही, प्रतिवादी (Defendant) सदर जमीन बेकायदेशीरपणे विक्री करण्याचा किंवा तृतीय पक्षाचे हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे.
त्यामुळे या नोटीसीद्वारे जाहीर करण्यात येते की,
१.सदर जमिनीवर न्यायालयीन वाद सुरु असल्याने कोणाही व्यक्तीने सदर जमिनीची खरेदी–विक्री, गहाणखत, भाडेपट्ट किंवा कोणताही व्यवहार करु नये.
२.सदर वादग्रस्त मिळकतीबाबत महानगरपालिकेत बांधकाम परवानगी देण्यास मनाई आहे.
३.जर कोणीही सदर जमिनीबाबत प्रतिवादी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार केल्यास, तो व्यवहार बेकायदेशीर मानला जाईल.
४.अशा व्यवहारातून उद्भवणाऱ्या कोणत्याही आर्थिक किंवा कायदेशीर नुकसानीस खरेदीदार स्वतः जबाबदार राहील
दिनांक–१७/१०/२०२६, अहिल्यानर

**आनंद मुरलीधर रोकडे**
मो. ८८०५२६५५५३

## जाहीर नोटीसीस उत्तर

तमाम लोकांना व विशेषतः ॲड. समीर वखारे यांना या जाहिर नोटीस उत्तराने कळविण्यात येते की, ॲड. समीर वखारे यांनी मौजे शहर नगर व अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे नं. २ क चे म्यु.घर नं. २०२क चे एकुण क्षेत्र १२.५५ चौ.मी. व त्यावरील तळमजला व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ११.३८ चौ.मी. या मिळकतीबाबत दिनांक १२/१०/२०२६ रोजी दै. नवा मराठा मध्ये प्रसिध्द केलेली जाहिर नोटीस आमचे अशिलाचे वाचण्यात आली. ॲड. समीर वखारे यांनी त्यांचे अशिलांचे नाव न दिल्याने ही नोटीस उत्तर ॲड. वखारे यांनाच दिलेली आहे.

सदरचे मिळकतीचे मुळ मालकांपैकी मुकुंद पुरुषोत्तम जोशी यांनी सदर मिळकतीबाबत वाटपासाठी स्पे.मु.नं. १७०/२०१७ मे. अहमदनगर येथील सिव्हील जज्ञ सि.डी. यांचे कोर्टात दाखल केलेला होता. सदर मिळकतीमध्ये एकुण ४ हिस्से असुन त्याबाबत अदयाप पावेतो वाटप झालेले नाही. सदर जाहिर नोटीसीवरुन मुकुंद पुरुषोत्तम जोशी यांनी कोर्टाकडून त्यांचा हिस्सा पृथक होऊन तो कुठल्या बाजुने आहे याबाबत निश्चीतता होण्यापुर्वीच संजय सुरेशराव ढोणे व इमरान अयाज शेख यांना विकल्याचे दिसते. सदर स्पे.मु.नं. १७०/२०१७ चे आदेशा अन्वये हिस्सा सुनिश्चितीसाठी एफ.डी. नं. १/२०२५ मे. कोर्टात प्रलंबित आहे व सदर प्रकरणामध्ये मुकुंद पुरुषोत्तम जोशी यांनी हजर होऊन म्हणणे देखील दिलेले आहे. आमचे अशिल यांचा सदर मिळकतीमध्ये ३/४ अविभक्त हिस्सा असुन त्यांना कोणत्याही प्रकारे विचारात न घेता तसेच त्यांची कोणत्याही प्रकारे संमती न घेता सदरची मिळकत विक्रीस काढल्याचे नोटीस वरुन दिसत आहे. आमचे अशिलांची त्यास सक्त हरकत आहे. तसेच सदर मिळकतीबाबत हिस्सा मे. कोर्टाकडून सुनिश्चीत झालेला नाही. तरी हया नोटीस उत्तराद्वारे स्पष्ट कळविण्यात येते की, सदरची मिळकत कोणीही खरेदी घेवु नये व प्रकरणात विनाकारण गुंतागुंत वाढवू नये ह्या उपरही कोणी खरेदी घेतल्यास खरेदी घेणाऱ्यास काही एक मालकी हक्क, ताबा, कब्जा मिळणार नाही ह्याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन मुद्दाम जाहिर उत्तर दिले आहे
ता. १९/१०/२०२६, अहिल्यानगर

**ॲड. राहुल विजय अत्रे**
२११, कोर्टयार्ड, बिल्डिंग, तारकपूर बस स्टॅण्डसमोर, तारकपूर, अहमदनगर, मो. ९८५०२४४४४८


# जिल्ह्यात गुटखा, सुगंधी तंबाखू विक्रीचे रॅकेट चालविणाऱ्या टोळीवर मोक्का लावा

## सकल हिंदू समाजाच्या शिष्टमंडळाची मागणी, पोलीस अधीक्षकांना दिली गुटखा तस्करांची यादी



जिल्ह्यात गुटखा, सुगंधी तंबाखू विक्रीचे रॅकेट चालविणाऱ्या टोळीवर मोक्का लावा या मागणीचे निवेदन पोलीस अधीक्षकांना देताना दिगंबर गेंट्याल, महेश चिंतामणी, कृष्णा भागानगरे, साई सोनवणे, आदित्य करमाळकर आदी.

नगर – राज्यात गुटखा, सुगंधी तंबाखू उत्पादन व विक्री करण्यास बंदी असतानाही अहिल्यानगर जिल्ह्यात संघटित रित्या गुटखा विक्रीचे रॅकेट चालविणाऱ्या अतिक डॉन व त्याच्या सहकाऱ्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला सम्राट व डायरेक्टर या नावाने गुटखा व सुगंधित तंबाखू जिल्हाभरात संघटित साखळी करून सर्रास विक्री केली जात आहे. या गुटखा व तंबाखूमुळे अनेक तरुणांना कॅन्सर सारख्या आजाराने आपले प्राण गमवावे लागत आहे. याची गंभीर दखल घेऊन कोट्यावधीचा महसूल मिळत असतानाही तत्कालीन राज्य सरकारने राज्यात गुटखाबंदी लागू केली. त्यानंतर च्या सर्व सरकारांनी देखील ही बंदी अव्याहत पणे सुरूच ठेवली, परंतु काही देशद्रोही, समाज द्रोही व लालची जीहाद्यानी आणि त्यांच्या पाठीराख्यांनी चोरून लपून गुटखा विक्री चालूच ठेवली. याबाबत अनेकांनी पोलीस प्रशासनाकडे तक्रारी करूनही संबंधितावर कारवाई न झाल्याने शहरात गुटखा विक्री सर्रास चालू आहे.

परंतु पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्याचे सूत्र हाती घेताच गुटखामुक्त शहर व गुटखामुक्त जिल्हा ही योजना राबवण्याचे आदेश पोलिसांना दिले, त्या सूचनेचे गेले काही महिने तंतोतंत पालन झाले. परंतु सध्या काही दिवसांपासून या संघटित गुटखा जिहादींनी पुन्हा मान वर काढली असून सकल हिंदू समाजाच्या वतीने या संघटित गुटखा जिहादींची नावे मोबाईल नंबर सह यादीच आपणास सादर करत आहोत. त्यांची नावे खालील प्रमाणे,

आतिक डॉन उर्फ अकिब मोहम्मद शेख याच्यावर एकूण सहा गुन्हे दाखल असून त्यापैकी एक कोठला येथे आठ पोलिसांवर हल्ला करून त्यांना जखमी करण्याचा गंभीर गुन्हा देखील आहे. त्याच्या सोबत इरफान सरदार पठाण हे दोघे संपूर्ण जिल्ह्याची टीम संभाळतात. त्यांनी त्यांच्या हाताखाली प्रत्येक तालुक्यात एक दोन म्होरके तयार केले आहेत.

त्यामध्ये अहिल्यानगर शहर – मोहसीन उर्फ वडा, जावेद उर्फ गच्चू उर्फ झाहीद खान, व नावेद बावा उर्फ बाबा तांबोळी, शिर्डी, कोपरगाव – आबिद व आशिष खाबिया, संगमनेर – आफ्रिदी, अकोले – शोएब काझी, पारनेर – विकास पवार, श्रीगोंदा – वसीम उर्फ कालू उर्फ शोएब तांबोळी, श्रीरामपूर – वसीम सय्यद उर्फ त्यासी, शेवगाव – नेवासा – ससाणे, शोएब पटेल तसेच संपूर्ण जिल्ह्यातील सुगंधित तंबाखू साठी हमीद पटेल, इर्शाद उर्फ लाला हे दोघे मूळचे छत्रपती संभाजीनगर चे असून हे सुगंधित तंबाखूचे मोठे व्यापारी आहेत. यांच्यामार्फत वरील आरोपी संपूर्ण जिल्हाभरात सुगंधित तंबाखू पुरवठा करतात.

वरील सर्व संघटित गुटखा जिहादीं वर गुटख्यासह इतर अनेक गंभीर गुन्हे वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये दाखल असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केल्याप्रमाणे या सर्वांवर मोक्काप्रमाणे कारवाई करण्यात यावी. अशी मागणी सकल हिंदू समाजाच्या वतीने दिगंबर गेंट्याल, महेश चिंतामणी, कृष्णा भागानगरे, साई सोनवणे, आदित्य करमाळकर आदींच्या शिष्टमंडळाने या निवेदनात केली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **श्री.हरिभाऊ लक्ष्मण कर्डिले रा.शिवनेरी नगर, वाकोडी ता.जि.अहिल्यानगर व श्री.संतोष रामदास म्हस्के रा. वाळूंज, ता.जि. अहिल्यानगर** यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून आमच्या अशिलाने विद्यमान मालक यांना विसारापोटी रक्कम दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम व बोजा विर्हित असून तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा विद्यमान मालक यांनी दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत, साठेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध होताच **७ दिवसांच्या** आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरून व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम आहे, असे ग्राह्य धरून आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन**– डि.अहिल्यानगर सब डिव्हीजन व तालुके अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर जिल्हापरिषद हद्दीतील मौजे शिरढोण येथील शेतजमीन मिळकत खालील प्रमाणे वर्णनाची–

| गट नंबर | क्षेत्रफळ (हे.आर) | आकार (रु.पै.) |
| --- | --- | --- |
| १७०/१/ब | १–४५ | ०–८४ |

**यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे अहमदनगर–सोलापूर महामार्गलगतचे संपूर्ण क्षेत्र १ हे.३०.८३ आर ही शेतजमीन मिळकत या मिळकतीबाबत .**

**यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे**

पुर्वेस – अहमदनगर – सोलापूर महामार्ग    पश्चिमेस –रस्ता
दक्षिणेस – गट नंबर १७० पैकी    उत्तरेस – गट नंबर १७१

येणेप्रमाणे चतु:सिमा पूर्वक शेतजमीन मिळकत यामधील वागणुकीच्या,वहिवाटीच्या येणे–जाणे हक्कासह काही एक राखून न ठेविता असे.

**ॲड. सचिन चंद्रकांत फुलसौंदर**
ऑफिस– तळ मजला, आनंद हाईट्स,
जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर. मो. नं. ९९२२२२७१७८

## ग्रामपंचायत रवंदे, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर जाहीर निविदा

ग्रामपंचायत रवंदे ता.कोपरगाव जि .अहिल्यानगर येथील खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी –१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे .

| अ . क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीयरक्कम | ठेकेदाराचा वर्ग |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | मौजे रवंदे येथील गावांतर्गत रस्ता काँक्रिटीकरण करणे | १५ वित्त आयोग सन २०२५–२६ | ५,००,०००/– | सु.बे |
| २ | मौजे रवंदे येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे | १५ वा वित्त आयोग सन२०२५–२६ | २,५९, ६८६/– | सु.बे |
| ३ | मौजे रवंदे येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे. भाग–१ | १५ वा वित्त आयोग सन२०२५–२६ | १,९२,४९६/– | खुला |

(काम पुर्ण करण्याचा कालावधी– ६ महिने)
अटी व शर्ती– १)निविदा फॉर्म माहिती पत्रक दि.१९/१०/२०२६ ते २६/१०/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील . २) बी–१निविदा दि .२७/१०/२०२६रोजी सकाळी ११.00 वाजता उघडण्यात येतील . ३)निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे . निविदेसोबत–१) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४)अनुभवाचा दाखला

ग्रामसेवक/सरपंच
**रवंदे, ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर**

## जाहीर प्रकटीकरण

**याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे टोपण नाव 'तस्लिम' (Taslim) असे होते, परंतु माझे मूळ आणि अधिकृत पूर्ण नाव 'सलमा शफिक सय्यद' (Salma Shafik Sayyed) हे आहे. माझे टोपण नाव 'तस्लिम' आणि अधिकृत नाव 'सलमा शफिक सय्यद' ही दोन्ही एकाच व्यक्तीची नावे असून, आजपासून सर्व कागदपत्रांमध्ये व पासपोर्टसाठी माझे नाव 'सलमा शफिक सय्यद' हेच ग्राह्य धरण्यात यावे. नाव: सलमा शफिक सय्यद (तस्लिम) पत्ता: W/O: शफिक सय्यद, वांबोरी, (PO: वांबोरी, १) DIST: अहमदनगर, महाराष्ट्र – ४१३७०४**


## मोटरसायकलची चोरी

नगर – केडगाव उपनगरातील भुषणनगर परिसरातून घरासमोर लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटरसायकल (क्र.एमएच १६ ए आर ८०१) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० ते १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत पवन विजय मुनोत (वय ३८, रा. भुषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी त्यांची मोटरसायकल घरासमोर लावलेली असताना अज्ञात चोरट्याने रात्रीतून ती चोरून नेली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.


राम एजन्सी
49 वर्षांची विश्वासाची परंपरा !
विश्वासाची खरेदी,
किमतीत भरघोस सूट
गुणवत्तेची हमी!
दीर्घकाळ समाधान
शुभ दसरा
सर्व नामांकित कंपन्यांचे इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे
नगर जिल्ह्यातील अधिकृत वितरक...
प्रशस्त पार्किंग सुविधा | फ्री होम डिलेव्हरी | फ्री डेमोन्स्ट्रेशन | फायनान्स सुविधा
सावेडी (गाऊती संकुल) 0241 - 2419141
नवीपेठ 0241 - 2419142
मार्केटयार्ड 0241 - 2419143
Eye Q Media


55
89
मुहूर्त विजयादशमीचा १९३७ पासून उत्तम योग सुवर्ण खरेदीचा
55 सोन्याची पाने जिंकण्याच्या संधीसोबत
स्थापना 1937
S.G.K.
एस.जी.कायगांवकर
JEWELLERS
• पहिली माळ - 1 सोन्याचे आपट्याचे पान • दुसरी माळ - 2 सोन्याचे आपट्याचे पान
• तिसरी माळ - 3 सोन्याचे आपट्याचे पान, प्रत्येक माळीप्रमाणे सोन्याचे 55 आपट्याचे पान मिळविण्याची सुवर्ण संधी.
सराफ बाजार 9890032323 | सावेडी 9511902345
सावेडीत प्रशस्त पार्किंग | कोर्पोरेट गिफ्ट व्हाऊचर | follow us on www.sgkaigaonkar.com


HONDA
प्रत्येक स्वप्नाच्या प्रवासात विश्वासाची साथ
₹75,000/-*
On Road Price
कोणताही अतिरिक्त शुल्क नाही
Shine 100 DX
₹1,25,000/-*
On Road Price
कोणताही अतिरिक्त शुल्क नाही
INTRODUCING THE ALL NEW
CB125 Hornet
*Terms and Conditions apply.
ह्या पेपर कटिंग घेवून येणाऱ्या ग्राहकांना हमखास गिफ्ट
रिरोन्सी होंडा
नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर
संपर्क - 8380027426, 7507006006
राहुरी - शेटे इस्टेट, फोन : 2426-235677
संपर्क - प्रशांत शेटे 8805455100
संपर्क - • सुपा- रिरोन्सी होंडा- 9370100804 • पारनेर-सुखकर्ता मोटर्स 9890499444 • निघोज-वर्धमान मोटर्स 9763770199
• वांबोरी-चैतन्य ऑटो 9960625825 • टाकळी ढोकेश्वर-ग्लोबल मोटर्स 7588607151